RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.



संपर्क
मो. 8482839451

गुरूवार, ०५ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Thursday, 05 June 2025 | Year : 5 | Issue : 158 | Daily | Rate: Rs. 5/-

## बंगळुरूत चेंगराचेंगरी

### १० जण जखमी, ७ जणांचा मृत्यू झाल्याची भीती



**बंगळुरू :** आरसीबीच्या विजयी परेडमध्ये चेंगराचेंगरी झाल्याची मोठी बातमी समोर येत आहे. या चेंगराचेंगरीमध्ये जवळपास 15 जण जखमी झाले आहेत. चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीत किमान दोघांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. जखमींची संख्या 15 झाली आहे आणि 4 जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना बोरिंग हॉस्पिटल आणि वैदेही हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे.

18 वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल 2025 चे जेतेपद पटकावले आहे. आरसीबीच्या विजयानंतर संपूर्ण जगभरातील चाहता वर्ग मोठ्या प्रमाणात जल्लोष करताना दिसला. यादरम्यान बंगळुरूमध्ये संघ या विजयाचा चाहत्यांबरोबर आनंद साजरा करण्यासाठी पोहोचला आहे. संघ प्रथम विधान सौधा येथे पोहोचला, जिथे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्याकडून संपूर्ण संघाचा सत्कार करण्यात आला.

चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीतील अनेक अंगावर काटा आणणारे व्हीडिओ समोर येत आहेत. यादरम्यान आरसीबीचा संघ चिन्नास्वामी स्टेडियममध्ये पोहोचला आहे. दरम्यान कार्यक्रमालाही सुरूवात झाली आहे. रजत पाटीदारने स्टेडियममध्ये येताच ट्रॉफी उंचावली.

**आरसीबी संघ एअरपोर्टला उतरल्यापासून ते विधान सौधाला टीम बस पोहोचेपर्यंत खेळाडूंची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी रस्त्यांवर मोठी गर्दी केली होती. अनुष्का शर्मानेही व्हीडिओ शेअर करत बंगळुरूमधील चाहत्यांचे प्रेम दाखवले होते. पण या चाहत्यांच्या गर्दीने वेगळेच रूप घेत आता चिन्नास्वामी स्टेडियमजवळ एक धक्कादायक स्थिती निर्माण झाली.**

## भारतीय जवानांची बदनामी करण्याचे स्वातंत्र्य नाही : उच्च न्यायालय

**अलाहाबाद :** भारतीय लष्कराबाबतच्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीवरून राहुल गांधींना मानहानी प्रकरणात दिलासा देण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. मात्र, त्याअंतर्गत भारतीय लष्कराला बदनाम करण्याचा अधिकार नाही. यासह न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या एकल पीठाने राहुल गांधी यांची याचिका फेटाळ्ली आहे. मानहानीच्या खटल्यात लखनौ एमपी-एमएलए कोर्टाने राहुल गांधींविरोधात समन्स जारी केले होते. त्याविरोधात राहुल गांधी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे दाद मागितली होती. त्यावर आज सुनावणी पार पडली.

न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी स्पष्ट केले की 'भारतीय संविधानाच्या कलम 19 (1) (अ) अंतर्गत काही वाजवी निर्बंधांसह अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे. मात्र, निःसंशयपणे याअंतर्गत कोणालाही भारतीय लष्कराची बदनामी करण्याचे स्वातंत्र्य दिले जात नाही.

बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनचे (बीआरओ) माजी संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी राहुल गांधींविरोधात लखनौ न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला आहे जो प्रलंबित आहे. यामध्ये म्हटलं आहे की राहुल गांधींनी 16 डिसेंबर 2022 रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान भारतीय लष्कराविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केली होती.

9 डिसेंबर 2022 रोजी भारतीय लष्कर व चिनी सैन्यात झालेल्या संघर्षाबाबत राहुल गांधी यांनी अपमानजनक वक्तव्य केल्याचं श्रीवास्तव यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे. राहुल यांनी भारतीय लष्कराला बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याचे श्रीवास्तव यांनी म्हटले आहे. श्रीवास्तव म्हणाले, 'राहुल गांधी वारंवार भारतीय लष्कराचा अपमान



करत आहेत. अरुणाचल प्रदेशमध्ये चीनचे सैनिक आपल्या जवानांना धोपटत आहेत. मात्र, भारतीय प्रसारमाध्यमे त्यावरून प्रश्न विचारत नाहीत, असे राहुल गांधींनी म्हटले होते.

लखनौ न्यायालयाने म्हटले होते की प्राथमिकदृष्ट्या असे दिसते की राहुल गांधी यांचे वक्तव्य भारतीय जवानांचे खच्चीकरण करणारे आहे. त्यांच्या वक्तव्याने आपले जवान, लष्कराशी संबंधित लोक व जवानांच्या कुटुंबीयांचे खच्चीकरण झाले आहे. त्यानंतर राहुल गांधी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## खासगी शाळांच्या फी वाढीच्या मनमानीला बसणार चाप ?



**नवी दिल्ली :** दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या सरकारने खासगी शाळांच्या फी वाढीच्या मनमानीच्या पार्श्वभूमीवर एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी दिल्ली सरकारने खासगी शाळांच्या संदर्भातील शुल्क नियमन विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली होती. त्यानंतर आता शालेय शिक्षण (शुल्क निर्धारण आणि नियमनात पारदर्शकता) विधेयक लागू करण्यासाठी सरकार अध्यादेश आणणार असल्याची माहिती दिल्लीचे शिक्षण मंत्री आशिष सूद यांनी दिली आहे. या संदर्भात त्यांनी म्हटले की, आम्ही दिल्ली शालेय शिक्षण पारदर्शकता विधेयक मांडणार आहोत. मात्र, हे विधेयक मागच्या विधानसभेच्या अधिवेशनात मांडता आले नव्हते. पण आता या विधेयकामुळे खासगी शाळांकडून होणारे शोषण थांबवण्यासाठी आम्ही या विधेयकाचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी अध्यादेश आणत आहोत. गेल्या 27 वर्षांपासून शाळा माफियांना पाठिंबा देणाऱ्यांना यामुळे खूप वाईट वाटले असेल.

## पंजाबमधील जसबीर सिंग याला अटक

**चंदिगड :** पाकिस्तानासाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली ज्योती मल्होत्रा या युट्यूबरला अटक करण्यात आल्यानंतर आता आणखी एका युट्यूबरला अटक करण्यात आली आहे. जान महल या नावाने युट्यूब चॅनेल चालवारा जसबीर सिंग याच्यावरही हेरगिरीचा आरोप ठेवण्यात आला आहे. त्याच्या युट्यूबचे जवळपास 11 लाख सबस्क्रायबर्स आहेत. रुपनगर जिल्ह्यातील महलान गावातील रहिवासी असलेल्या सिंगवर मोहाली येथील स्टेट स्पेशल ऑपरेशन्स सेलने ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारावर त्याला अटक करण्यात आली. हरियाणातील ज्योती मल्होत्राशीही त्याचा नियमित संपर्क होता.

## जातनिहाय जनगणना सुरु होणार...

### यावेळी जनगणनेच्या कागदपत्रांमध्ये जातीचा कॉलम (स्तंभ) समाविष्ट करण्यात आला आहे.

**नवी दिल्ली :** भारतात 1 ऑक्टोबर 2026 पासून जनगणनेला सुरुवात होणार आहे. ही जनगणना दोन टप्प्यांमध्ये पूर्ण केली जाईल. यावेळी जातनिहाय जनगणना केली जाणार आहे. लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड या बर्फाळ प्रदेश असलेल्या राज्यांमध्ये 1 ऑक्टोबर 2026 पासून जनगणनेला सुरुवात केली जाईल. तर, देशाच्या उर्वरित भागात 1 मार्च 2027 पासून जनगणना केली जाईल. यावेळी जनगणनेच्या कागदपत्रांमध्ये जातीचा कॉलम (स्तंभ/रकाना) समाविष्ट करण्यात आला आहे. जनगणना करणारे कर्मचारी प्रत्येक घरांत जाऊन लोकांची माहिती गोळा करतील. यामध्ये त्यांच्या जातीबाबतची माहिती देखील घेतली जाणार आहे.



जातनिहाय लोकसंख्या जाणून घेणे, समाजातील विविध वर्गांची स्थिती जाणून घेणे हे त्यामागचं प्रमुख उद्दीष्ट आहे. करोनामुळे जनगणना स्थगिती केली होती. भारतात 2011 साली शेवटची जनगणना करण्यात आली होती. तत्पूर्वी, दर 10 वर्षांनी देशात जनगणना केली जात होती. त्यानुसार 2021 मध्ये जनगणना करणं अपेक्षित होतं. मात्र, केंद्रातील मोदी सरकारने जनगणना केली नाही. सुरुवातीला करोनामुळे जनगणनेचा निर्णय स्थगित केल्याचे सांगितले जात होते. मात्र, देश करोनाच्या संकटातून मुक्त झाल्यानंतरही जनगणना केली गेली नाही. परिणामी गेल्या पाच वर्षांपासून विरोधी पक्षांनी, प्रामुख्याने काँग्रेस व खासदार राहुल गांधी यांनी जनगणनेची मागणी लावून धरली. त्यांनी जातनिहाय जनगणनेवर जोर दिला.अखेर केंद्र सरकारने जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे.

## महाविद्यालयांची प्रवेशप्रक्रिया बारगळली



**कामठी :** महाविद्यालयांत प्रवेश घेण्याच्या प्रक्रियेत गोंधळ निर्माण झाला असून दाखले देण्यासाठी राज्याचे मुख्य संकेतस्थळच वारंवार बंद होत असल्याने विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया बारगळली आहे. शहरातील तसेच ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांचे दाखले अडकले आहेत. परिणामी, विद्यार्थी हवालदिल झाले आहेत. तसेच महा ई-सेवा केंद्रचालकांना एकाच लॉगिनवरून काम करावे लागत असल्याने केंद्रांमधून दररोज दिल्या जाणाऱ्या दाखल्यांचे प्रमाण तब्बल 30 टक्क्यांनी घटले आहे. त्यामुळेही, दाखले देण्यात अडचणी येत आहेत. जून व जुलै महिना महाविद्यालयांच्या प्रवेशाचा काळ असल्याने विद्यार्थी तसेच पालकांना महा ई-सेवा केंद्रांवर हेलपाटे मारावे लागतात. प्रवेशांसाठी अद्ययावत दाखल्यांची मागणी होत असल्याने विद्यार्थ्यांना नव्याने दाखले काढण्यासाठी अर्ज करावे लागतात. त्यामुळे, वेळेपूर्वी दाखले काढावेत, असे प्रशासनाचे आवाहन कुचकामी ठरत आहे. या कालावधीत दाखल्यांसाठी झुंबड उडणे नित्याचेच झाले आहे. हे दाखले विद्यार्थ्यांना वेळेत मिळावेत, तसेच यातील गैरप्रकारांना आळा बसावा, यासाठी राज्य सरकारने गेल्यावर्षी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' अर्थात 'फिफो' ही प्रणाली लागू केली होती. मात्र, दाखले देताना मोठा गोंधळ उडाल्याने ही प्रणाली रद्द करण्यात आली होती.

## शरद पवारांचा इंडिया आघाडीपासून दुरावा ?



**मुंबई :** भारताने ऑपरेशन सिंदूर राबवित पाकिस्तान मधील दहशतवाद्यांचे अनेक अड्डे उद्ध्वस्त केले. या लष्करी मोहिमेनंतर पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर आणण्यासाठी केंद्र सरकारने सर्वपक्षीय खासदारांची शिष्टमंडळे परदेशात पाठवली आहेत. पाकिस्तानशी झालेल्या युद्धविरामानंतर लोकसभेचे विरोधीपक्षनेते राहुल गांधी हे केंद्र सरकारला सातत्याने लक्ष्य करीत आहेत. यादरम्यान, इंडिया आघाडीतील काही प्रमुख नेत्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना एक पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. मात्र, त्यांच्या या मागणीशी शरद पवार हे सहमत नसल्याचे सांगितले जात आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ला, तसेच पूंछ, उरी आणि राजौरी येथे झालेली सामान्य नागरिकांची हत्या, शस्त्रसंधीच्या घोषणा आणि यामुळे राष्ट्रीय सुरक्षेवर व परराष्ट्र धोरणावर होणारे परिणाम. यासारख्या घटनांमुळे देशासमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. भारताची भूमिका जगासमोर मांडण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना आम्ही पाठिंबा दिला आहे', असं इंडिया आघाडीच्या नेत्यांनी पत्रात म्हटले.

## बोगस लाडक्या बहिणी 'हा निवडणूकपूर्व मोठा आर्थिक घोटाळाच : आप

**पुणे :** गेल्या वर्षी महायुती सरकारला प्रचंड बहुमत आणि मुख्यत्वे मोठ्या प्रमाणावर महिलांचे मतदान मिळवून देणाऱ्या लाडकी बहीण योजनेमधून बोगस आणि अपात्र महिलांना पैसे देणे हा निवडणूकपूर्व मोठा आर्थिक घोटाळाच होता, असा आरोप मंगळवारी (दि. 3) आम आदमी पार्टीचे प्रवक्ते मुकुंद किर्दत यांनी केला आहे.

लाडकी बहीण योजनेमध्ये अनेक महिला राज्य सरकारी कर्मचारी तसेच आर्थिक निकषात न बसणाऱ्या महिलांचे अर्ज प्रामुख्याने महायुतीच्या भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट, शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी स्टॉल लावून, पक्ष कार्यालयातून भरले. इतर विरोधी पक्षाच्या




नेत्यांनी यापासून दूर राहणेच पसंत केले होते. त्यामुळे या बोगस, अपात्र महिलांना निवडणुकीतील आमिष म्हणूनच कोट्यवधी रकमेचे वाटप केले गेले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'ज्यावेळी ही योजना आणली त्यावेळी आमच्याकडे फार कमी काळ होता. दोन-तीन महिन्यांत लगेच निवडणुका लागणार होत्या. त्यामुळे काहींनी अर्ज केले. आता दिलेले पैसे काढून घेण्याचा प्रश्न येत नाही. मान्य आहे चूक झाली,' असे स्पष्टीकरण दिले आहे. या अपात्र महिलांवर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु, ज्या खात्याच्या मंत्र्यांनी, अधिकाऱ्यांनी संगनमताने हे अर्ज मान्य केले व त्यांचे नावे पैसे दिले त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. यापूर्वीसुद्धा शेतकऱ्यांना कर्जमाफी पैसे देतांना त्याची व्यवस्थित तपासणी करूनच पैसे देऊ, असे फडणवीस यांनी सातत्याने सांगितले होते. या लाडकी बहीण योजनेंतर्गत आत्तापर्यंत जवळपास 4 हजार 800 कोटींची रक्कम वितरित झाली असल्याची आकडेवारी पाहता 500 कोटींपेक्षा अधिकचा हा भ्रष्टाचार असू शकतो, असे 'आप'चे मुकुंद किर्दत यांनी सांगितले

## संसदेचे पावसाळी अधिवेशन 21 जुलै ?



**नवी दिल्ली :** संसदेचे पावसाळी अधिवेशन 21 जुलैपासून सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी दिली आहे. संसदेचे हे पावसाळी अधिवेशन 21 जुलै ते 12 ऑगस्ट या दरम्यान असणार आहे. या अधिवेशनाच्या काळात संसदेच्या दोन्ही सभागृहात देशातील विविध विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. 21 जुलै रोजी सकाळी 11 वाजता अधिवेशनाच्या कामकाजाला सुरुवात होणार असल्याची माहिती मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. दरम्यान, संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवर देखील चर्चा होण्याची शक्यता आहे. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज समितीने पावसाळी अधिवेशनाच्या संदर्भातील तारखांबाबत निर्णय घेतत आल्याचे मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले आहे. जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्यात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला होता. तसेच अनेक जण जखमी झाले होते. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले. अद्यापही भारता आणि पाकिस्तानमध्ये काही प्रमाणात तणावाचे वातावरण असल्याचे सांगितले जातं. या पार्श्वभूमीवरून ऑपरेशन सिंदूरच्या अनुषंगाने विशेष सत्र घेण्याची मागणी विरोधकांनी केली होती. मात्र, विशेष सत्र घेण्याबाबत केंद्र सरकारने कोणताही निर्णय घेतला नाही.

**मदतनिस पाहिज**

सुगतनगर, इंदोरा परिसरातील रहिवासी असणारा एक पदविधर मदतनिस पाहिजे.

पगार ९०००/- रूपये महिना

संपर्क
मो. 7507661569

## कमल हासन यांच्या वक्तव्यावरील वादामुळे दोन राज्यात फूट



**कर्नाटक :** कावेरी नदीच्या पाण्यावरून दशकांपासून भांडत असलेली राज्ये कर्नाटक आणि तमिळनाडू आता एका नवीन मुद्द्यावरून वादात आहेत. तो मुद्दा म्हणजे भाषा. अभिनेते कमल हासन यांनी कन्नड भाषेचा उगम तमीळ भाषेतूनच झाला आहे, असे वक्तव्य अलीकडेच केले होते. त्यावरून कन्नडवासीयांच्या भावना दुखावल्या आणि राजकीय प्रतिक्रियांची लाटही उसळ्ली. या कारणामुळे इंडिया आघाडीत परस्परविरोधी भूमिका समोर आल्या आहेत. कर्नाटकात काँग्रेस नेत्यांनी हासन यांच्या विधानाचा तीव्र निषेध केला आहे आणि त्यांनी याबाबत जाहीर माफी मागावी, अशी मागणीही केली आहे. दरम्यान, तमिळनाडूमध्ये सत्ताधारी द्रमुकने हासन यांना पाठिंबा दिला आहे आणि त्यांनी केलेल्या वक्तव्यात काहीही आक्षेपार्ह नसल्याचे म्हटले आहे. दोन्ही राज्य सरकारांमध्ये थेट वाद नसला तरी वेगवेगळ्या प्रतिक्रियांमुळे या प्रदेशातील भाषिक संवेदनशीलता अधोरेखित झाली आहे. राज्यातील सहयोगी पक्षांमध्येच अशा दोन भूमिका दिसल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. हासन यांच्या ठग लाईफ या चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी हा वाद निर्माण झाला होता.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी हासन यांना बिचारे कमल हासन असे संबोधत म्हटले, 'त्यांना कन्नड भाषेचा दीर्घकालीन इतिहास माहीत नाही.' उपमुख्यमंत्री डी. के.शिवकुमार म्हणाले, 'दोन्ही राज्ये मित्र आहेत; शत्रू नाहीत. त्यामुळे हा राजकीय मुद्दा होऊ देऊ नये. आपण शेजारी आहोत. आपण सर्वांनी एकत्र काम केले पाहिजे आणि एकत्र राहिले पाहिजे. इकडचे पाणी तमिळनाडूला जाते आणि तमिळनाडूचे लोक येथे येतात. मला त्यावर मत द्यायचे नाही. कारण- मला त्या मुद्द्याचा इतिहास माहीत नाही.' असे असताना कर्नाटकचे मंत्री शिवराज तंगडागी यांनी असे स्पष्ट केले, 'अभिनेता हासन यांनी त्यांच्या वक्तव्याबद्दल माफी मागितली नाही, तर कर्नाटक फिल्म चेंबर्स ऑफ कॉमर्सने निर्णय घेतल्यानुसार त्यांच्या चित्रपटांवर राज्यात बंदी घातली जाईल.

कर्नाटकचे मंत्री ईश्वरा खांद्रे यांनीही कमल हासन यांच्या विधानाचा निषेध केला आहे. कर्नाटकचे मंत्री संतोष लाड यांनीही असेच मत व्यक्त करताना म्हटले, 'त्यांचे मत काहीही असो. आम्हाला आमच्या भूमीबद्दल आणि भाषेबद्दल खूप आदर आहे. मी त्यांचे विधान वाचलेले नाही. मात्र जर त्यांच्या विधानामुळे भाषेबद्दलच्या आमच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, तर मी त्यांचा निषेध करतो.

तमिळनाडूचे नगरपालिका प्रशासन, शहरी व पाणीपुरवठा मंत्री के. एन. नेहरू यांनी हासन यांना पाठिंबा दिला आहे. ते म्हणाले, *'हासन यांनी जे म्हटले, ते काही चुकीचे नाही. तेलुगू, मल्याळम या भाषांचा जन्म तमीळ भाषेतून झाला आहे, त्यांनी जे म्हटले ते चुकीचे नाही.÷ द्रमुकचे प्रवक्ते टी. के. एस. एलांगोवन यांनी म्हटले, ÷हासन यांनी कन्नडचा अपमान केला नाही आणि भाजपानं फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे.'*

## मतदानाची टक्केवारी जलद आणि अचूक नोंदवण्यासाठी तंत्रज्ञानावर भर : निवडणूक आयोग



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीदरम्यान मतदानाच्या टक्केवारीत डेटा प्रकाशित करण्यात विलंब झाल्याबद्दल निवडणूक आयोगावर प्रचंड टीका झाली होती. त्यानंतर जवळपास एक वर्षानंतर निवडणूक आयोगाने निकाल जलद आणि अधिक पारदर्शक पद्धतीने सुनिश्चित करण्यासाठी त्यांच्या अहवाल प्रणालीमध्ये सुधारणा केली आहे. भारतीय निवडणूक आयोगाकडून मतदानाची टक्केवारी जाहीर करण्यात आता विलंब होणार नाही. कारण- निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदान केंद्राच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांना दर दोन तासांनी नवीन ECINET या ॲपवर मतदारांची टक्केवारी थेट नोंदविण्याची परवानगी दिली आहे. या नवीन उपक्रमामुळे अंदाजे मतदान ट्रेंडच्या अपडेटमध्ये लागणारा वेळ कमी होईल. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी ही सुधारित प्रक्रिया लागू केली जाईल. एक महत्त्वाचा बदल म्हणजे मतदान केंद्र सोडण्यापूर्वी मतदान केंद्राचे जनसंपर्क अधिकारी मतदान संपल्यानंतर लगेचच अंतिम मतदानाचा डेटा ECINET मध्ये प्रविष्ट करतील. त्यामुळे अहवाल देण्यास होणारा विलंब लक्षणीयरीत्या कमी होईल आणि नेटवर्क उपलब्धतेनुसार मतदारसंघनिहाय मतदानाचा डेटा व्हीटीआर ॲपवर त्वरित उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

**अहिल्याबाई शिवाजी रामटेके**



**२९ वा स्मृतिदिन**



अहिल्याआईने गवताचे भारे विकून मुलगा विक्रम, मुलगी दमयंती यांना शिक्षित केले. मुलगा प्राचार्य व मुलगी स्टाफ नर्स म्हणून रिटायर्ड झाले. यांचे कडून आणि नातू शिलवकुमार, हर्षल व शितल आणि त्यांचे परिवार, नातीन सुचिता, अनिता व स्मिता आणि त्यांचे परिवार आणि समस्त परिवाराकडून ...

**यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन**

“ स्वतंत्रतेची निष्ठा असलेले माणूस
सर्वदा सामर्थ्यांच्या उंचावर असतो... ”



## संपादकीय

# आधुनिक समृद्धीतून निर्माण होणाऱ्या नवीन समस्या

एकीकडे भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था झाली असतानाच आणि देशातील नवश्रीमंतांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असतानाच जर विवाहितांचे छळ आणि हुंड्यासाठी त्यांचे झालेले मृत्यू याचे प्रमाणही वाढत असेल तर आधुनिक काळातील या समृद्धीतून अजून कोणकोणत्या नवीन समस्या निर्माण होणार आहेत याचा विचार यानिमित्ताने करावा लागणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावर मीडियामध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली आहे. वैष्णवीच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या सर्वांना अटकही करण्यात आली आहे. अर्थात, ही एक हाय प्रोफाइल केस असल्यामुळे त्याची चर्चा झाली आणि मीडियानेसुद्धा हा विषय उचलून धरला. पण आजही महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यात दररोज कोठे ना कोठे हुंड्यासाठी असा एखादा विवाहितेचा बळी जातो हे वास्तवही नाकारून चालणार नाही. घरगुती हिंसाचारामधून किंवा हुंड्याच्या मागणीमधून नवविवाहित महिलांचा किती बळी गेला याची आकडेवारी जी शेवटची 2022 मध्ये जाहीर करण्यात आली होती त्याप्रमाणे दरवर्षी किमान 8 हजार महिला अशा प्रकारे मृत्यूमुखी पडतात. घरगुती हिंसाचारावर नियंत्रण ठेवणारा आणि हुंडाबंदी करणारा कायदा देशात अस्तित्वात असला तरी अशा कायद्यांचे भय संबंधितांना नाही हेच या वाढत्या घटनांवरून लक्षात येते. मुलीचा गरीब पिता जर सासरच्यांना काही देऊ शकला नाही, तर त्या रागातून त्या मुलीचा छळ केला जातो. त्यातून तिची हत्या होते किंवा ती आत्महत्या करते. तसेच वैष्णवी हगवणे सारख्या प्रकरणांचा विचार करता दोन्ही बाजू जेव्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम असतात तेव्हासुद्धा अशाप्रकारे हुंडाबळीच्या घटना घडत असतील तर त्याला विकृत मानसिकताच जबाबदार आहे. हुंडा देणे आणि हुंडा घेणे हे दोन्हीही गुन्हे असले तरी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून लग्नामध्ये वारेमाप खर्च करून इव्हेंट केले जाते आणि अनेक वेळा या इव्हेंटचा खर्च वधुपित्याच्या माथीच मारला जातो. लग्नामध्ये एवढ्या मोठा प्रमाणावर जर वधुपित्याने खर्च केला तर आपोआपच वराकडच्या लोकांच्या अपेक्षा वाढत जातात आणि लग्नानंतरसुद्धा हा विषय जास्तच जटील बनत जातो. वैष्णवी हगवणे प्रकरणामध्ये अशाच प्रकारच्या घटना घडल्या आहेत. एकाच घरातील दोन सुनांचा जेव्हा छळ झाल्याच्या घटना समोर येतात तेव्हा अशा घरातील लोक लग्नाकडे एक व्यवसाय म्हणून बघतात की काय अशीसुद्धा शंका आल्याशिवाय राहात नाही. भारतीय समाजात अजूनही अस्तित्वात असलेली मानसिकतासुद्धा लग्न करून सासरी गेलेल्या मुलींच्या मृत्यूला जबाबदार असते. मुलीचे लग्न झाले की सासर हेच तिचे घर ही मानसिकता समाजामध्ये दीर्घकाळपासून रुतून बसली आहे. त्यामुळेच अशाप्रकारचे बळी जातात. ज्या घरातील मोठी सून छळाला कंटाळून घरातून निघून गेली आहे, त्या घराचा इतिहास माहीत असतानासुद्धा वैष्णवीच्या आई-वडिलांच्या लक्षात या घटनेचे गांभीर्य आले नाही हेसुद्धा महत्त्वाचे मानावे लागेल. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण हे जर प्रातिनिधिक मानले तर महाराष्ट्रात किंवा भारतात अनेक ठिकाणी अशाप्रकारच्या घटना केवळ या पारंपरिक मानसिकतेमुळेच वाढत चालल्या आहेत हेसुद्धा विसरता येणार नाही. कितीही कायदे अस्तित्वात असले आणि महिला आयोगासारख्या संस्थांचेही काम चालू असले तरी अशाप्रकारच्या घटना घडल्यानंतरच या संस्थांचे किंवा कायद्याचे काम चालू होते. हुंडाबंदी कायदा असो किंवा घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा असो, खरे तर हे दोन्हीही कायदे अशाप्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून अस्तित्वात आणण्यात आले आहेत. पण या कायद्यांचा प्रभावी वापर होत नाही किंवा संबंधित लोकांना या कायद्यांचा प्रभाव माहीत नाही असेच दुर्दैवाने म्हणावे लागते. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामध्ये मीडियाने मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी दिल्यानंतर सर्व सूत्रे गोष्टसुद्धा या निमित्ताने लक्षात घ्यावी लागणार आहे. महाराष्ट्राच्या किंवा देशाच्या ग्रामीण भागामध्ये आणि खेड्यापाड्यांमध्ये अनेक वेळा हुंडाबळींची नोंदच होत नाही किंवा विवाहितांवर होणाऱ्या अत्याचारांबाबत तिच्याकडून दादच मागितली जात नाही हेसुद्धा वास्तव नाकारता येत नाही. कोणतेही प्रतिबंधक कायदे असो किंवा महिला आयोगासारख्या संघटना असो त्यांनी आपापल्या पातळीवर जरी काम केले तरी शेवटी लग्न हा ज्यांचा वैयक्तिक विषय आहे त्या वधू आणि वर यांचे कुटुंबीय याबाबत कशा प्रकारची भूमिका घेतात हे सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. साहजिकच हुंड्याच्या अनिष्ट आणि गलिच्छ प्रथेमुळे समाजाला लागलेली ही आग जर विझवायची असेल तर सरकार, कायदेशीर यंत्रणा किंवा सामाजिक संघटना यांच्यापेक्षाही वधू, वर आणि त्यांचे कुटुंबीय या सर्वांची मानसिकताच महत्त्वाची ठरणार आहे. समाजाला लागू पाहणारी ही आग कशी विझवायची याचा विचार करण्याऐवजी ही आग अजिबात लागणारच नाही याचा विचार प्राधान्याने करावा लागणार आहे, असा संदेश निश्चितच वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणाने दिला आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# सेना आणि राजकारण यांच्यातील रेषा - लोकशाहीची मर्यादा



कृ प्रत्येक देशाची लोकशाही व्यवस्था काही मूलभूत तत्त्वांवर आधारित असते, ज्यात नागरिक स्वातंत्र्य, सत्ता विकेंद्रीकरण आणि संस्थांची पारदर्शकता यांचा समावेश होतो. भारतासारख्या लोकशाही देशात, सेना (फौज) आणि राजकारण या दोन स्वतंत्र संस्था आहेत, ज्यांची भूमिका स्पष्टपणे परिभाषित केली आहे. सेना देशाच्या सुरक्षा आणि अखंडतेची रक्षा करते, तर राजकारण शासन चालवण्याचे आणि धोरणनिर्मितीचे कार्य करते. या दोन्ही संस्थांमधील रेषा - म्हणजेच सीमांकन - लोकशाहीच्या रक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्राच्या सुरक्षेची चर्चा करताना, मनात सर्वप्रथम येणारे नाव म्हणजे आपली सेना - आपली फौज. एक अशी संस्था जी निष्कलंक भावनेने, प्राणाची बाजी लावून देशाच्या सीमांची रक्षा करते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशांपैकी एक आहे. याची वैशिष्ट्ये म्हणजे येथे शासन संविधान आणि संस्थांच्या माध्यमातून चालते. भारतातील लोकशाहीच्या यशाचे एक प्रमुख कारण म्हणजे येथे सेना आणि राजकारण यांच्यात स्पष्ट आणि सन्मानजन्य अंतर राखले गेले आहे. फौज ही एक अशी संस्था आहे जी पूर्णपणे गैर-राजनीतिक, व्यावसायिक आणि शिस्तबद्ध मानली जाते. तर राजकारण ही एक स्पर्धात्मक प्रक्रिया आहे, ज्यात विविध विचारधारांचे, मतभेदांचे आणि मतगणनांचे स्थान असते. या दोन्हींची कार्यक्षेत्र वेगळी आहेत आणि म्हणूनच दोन्हींच्या मधील रेषा ओलांडणे केवळ अनुचित नाही, तर लोकशाहीसाठी गंभीर धोका देखील आहे. राजकीय पक्ष जेव्हा या रेषेला ओलांडतात - जसे की फौजच्या नावावरून मत मागणे, सैन्याच्या कारवायांचा राजकीय फायदा घेणे किंवा सैनिकांना राजकीय प्रचारात सामील करणे - तेव्हा हे सर्व लोकशाही मूल्यांसाठी धोकादायक आहे. यामुळे सैन्याच्या निःष्पक्षता आणि प्रतिष्ठेला ठेस तर पोहोचतेच पण हे फौजचे राजकीयरण करण्याच्या दिशेने एक धोकादायक पाऊल ठरते.

**सेना आणि राजकारण यांचे कार्यक्षेत्र :-** सेना (फौज) ही एक व्यावसायिक संस्था आहे जिचे मुख्य कार्य देशाच्या सीमांची रक्षा करणे, आपत्कालीन परिस्थितींमध्ये नागरी प्रशासनाला मदत करणे, दहशतवाद आणि उग्रवादाशी लढणे हे आहे. सेनेचे संविधान प्रती पूर्ण समर्पण आणि निःष्पक्षता ही त्याची सर्वात मोठी ताकद आहे. सेना धर्म, जात किंवा विचारधारेच्या आधारावर भेदभाव करत नाही. ती कोणत्याही राजकीय पक्षाच्या सेवेत नसते आणि कोणत्याही विचारधारेची प्रचारक नसते. तिला ना कोणता पक्ष असतो, ना निवडणुकीचा कोणता फायदा, ना सत्ता मिळवण्याची महत्वाकांक्षा - तिचा एकच अजेंडा असतो, राष्ट्रहित! जेव्हा एखादा सैनिक देशाच्या सीमेवर संरक्षणार्थ तैनात असतो, तेव्हा तो हे विचारत नाही की दिल्लीमध्ये कोणाची सत्ता आहे. त्याची नजर फक्त तिरंग्यावर असते. तो देशासाठी, तिरंग्याच्या सन्मानासाठी आपल्या प्राणाची आहुती देण्यासाठी नेहमी तयार असतो. परंतु जर आपण वारंवार सैनिकांच्या शौर्याला एका विशिष्ट पक्षाच्या यशस्वितेच्या रूपात प्रस्तुत करायला लागलो, किंवा फौजाच्या कारवायांना वोट बँक रणनीतीत समाविष्ट करतो त्यावेळेस आपण सेनेच्या प्रतिष्ठेला कमी करतो हे लक्षात घ्यायला हवे. लोकशाहीत राजकारण ती प्रक्रिया आहे. ज्याद्वारे लोकप्रतिनिधी निवडले जातात, धोरणे बनवली जातात आणि देशाचे प्रशासन चालते. हे विचार, वादविवाद, संवाद आणि निवडणुकांच्या माध्यमातून पुढे जाते. राजकीय पक्षांचे अजेंडा स्पष्ट असतो. सत्ता मिळवणे, ती टिकवणे, आणि त्यांच्या विचारधारेनुसार देशाला दिशा देणे. सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष, दोन्हीही त्यांच्या फायद्यासाठी मुद्यांची निवड करतात आणि जनतेच्या भावनांना साद घालण्याचा प्रयत्न करतात. ही निवडणूक राजकारणाची वास्तविकता आहे. या दोन्ही संस्थांचे कार्यक्षेत्र वेगळे आहेत, परंतु जर राजकारण फौजच्या प्रतिष्ठेत हस्तक्षेप करू लागले, फौजच्या प्रतिमेचा उपयोग आपल्या फायद्याकरिता करू लागले, तर हे लोकशाहीसाठी गंभीर संकट ठरू शकते. सेना आणि राजकारण यांच्यातील रेषा ही एक मर्यादा आहे, जी आपल्या लोकशाहीच्या बळकटीचा पाया आहे. खरेतर ही रेषा म्हणजे लोकशाही आणि हुकूमशाही यांच्यातील अंतर आहे. जर आपण ही रेषा ओलांडली तर आपली लोकशाही दुर्बल होईल यात शंका नाही.'

**राजकीय हस्तक्षेपाचे संभाव्य दुष्परिणाम :-** सेनेच्या कारवायांना निवडणुकीच्या भाषणांचा भाग बनवणे, किंवा फौजी शौर्याला पक्ष प्रचारात समाविष्ट करणे, हि बाब याची द्योतक आहे की आपण आपल्या देशाच्या रक्षकांना देखील राजकीय फायद्याचे साधन म्हणून पाहू लागलो आहोत. जर राजकीय पक्ष त्यांच्या स्वार्थपूर्तीसाठी फौजचा अशा प्रकारे वापर करू लागले, तर त्याचे दूरगामी दुष्परिणाम लोकशाही संस्थांच्या विश्वासार्हतेवर होऊ शकतात. जेव्हा एखादा राजकीय पक्ष, सेनेच्या कारवायांना निवडणुकीच्या मंचावर प्रचाराचा विषय बनवतो, तेव्हा यामुळे हा भ्रम निर्माण होऊ शकतो की फौज एखाद्या विशिष्ट पक्षाच्या अधीन कार्य करत आहे. सामान्य जनतेला हा संदेश जावू शकतो की फौज एका विशिष्ट राजकीय विचारधारेशी संबंधित आहे, हि बाब लोकशाहीसाठी अत्यंत हानिकारक आहे. यामुळे फौजच्या निष्पक्ष प्रतिमेला धक्का पोहोचू शकतो, फौजच्या तटस्थतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकतात. जर सैनिकांना राजकारणात ओढले गेले, तर त्यांची निष्ठा आणि उद्दिष्टावर शंका घेतल्या जाऊ शकते. याचा विपरीत परिणाम फौजेच्या एकतेवर, शिस्तीवर आणि मनोबलावर होऊ शकतो. जेव्हा फौज राजकीय वादविवादात ओढली जाते, तेव्हा ती तिची तटस्थता गमावू शकते. यामुळे तिच्या निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्यावर परिणाम होऊ शकतो. जेव्हा फौजला राजकीय मंचावर आणले जाते, तेव्हा जनतेचे लक्ष वास्तविक मुद्यांवरून भावनिक मुद्यांकडे वळते. यामुळे सामाजिक धृवीकरण आणि मतदारांना गोंधळात टाकण्याची प्रवृत्ती वाढते. जर राजकारण सैन्याच्या यशावर स्वार होऊन सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करू लागले, तर लोकशाहीतील चर्चा, उत्तरदायित्व आणि धोरणनिर्मिती हे सर्व मुद्दे मागे पडतात. ही स्थिती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवरच घाला घालणारी आहे आणि यामुळे लोकशाही दुर्बल होऊ शकते. भारतातील लष्करी परंपरा अत्यंत सन्माननीय व गौरवशाली राहिली आहे. 1971 चा भारत-पाक युद्ध विजय असो किंवा 1999 चे कारगिल युद्ध - भारतीय सैन्याने नेहमीच आपल्या शौर्य, साहस, समर्पण आणि शिस्तीचे दर्शन घडवले आहे. मात्र अलीकडच्या काळात काही राजकीय पक्ष या लष्करी कामगिरीचा उपयोग निवडणुकीच्या फायद्यासाठी करताना दिसत आहेत. ही प्रवृत्ती केवळ चुकीचीच नाही, तर लष्कराला राजकीय वादविवादाचा विषय बनवून त्याच्या प्रतिष्ठेलाही धक्का पोचवणारी आहे. अलीकडे 'सर्जिकल स्ट्राइक' आणि 'एअर स्ट्राइक' सारख्या लष्करी कारवायांचा प्रचार निवडणूक मंचांवर झाला, तेव्हा अनेक माजी लष्करी अधिकाऱ्यांनी आणि संरक्षण तज्ज्ञांनी याबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी स्पष्ट सांगितले की युद्ध आणि लष्करी कारवाया या राष्ट्राच्या सुरक्षेशी संबंधित आहेत, निवडणुकीच्या प्रचारासाठी नाहीत. देशभक्ती आणि लष्कर हे दोन्ही विषय अतिशय भावनिक आणि सन्मानजनक आहेत. मात्र त्यांच्या नावाखाली राजकारण करणे हे एक प्रकारचे नैतिक अधःपतन आहे. यामुळे केवळ सैन्याची प्रतिष्ठा नव्हे, तर लोकशाहीचा आत्माही दुखावल्या जातो. जगातील अनेक देशांमध्ये जिथे सैन्याचे राजकीयकरण झाले आहे, तिथे लोकशाही कमजोर झाली आहे किंवा तिथे हुकूमशाही जन्माला आली आहे. पाकिस्तान, म्यानमार आणि थायलंड ही त्याची उदाहरणे आहेत. जिथे सैन्याने राजकारणात हस्तक्षेप केला आणि लोकशाहीला मागे टाकले. भारताने ही चूक टाळली पाहिजे. काय करणे आवश्यक आहे? निवडणूक आयोगाने अशा कोणत्याही राजकीय क्रियाकलापांवर कठोर प्रतिबंध घालायला हवा, ज्यात सैन्याचा वापर प्रचारासाठी केला जातो. हे सुनिश्चित केले पाहिजे की सैनिकांचे कुटुंबीय किंवा सेवानिवृत्त सैनिकांचा वापर राजकीय हेतूंसाठी होऊ नये आणि सैन्याच्या कोणत्याही कामगिरीचा उपयोग निवडणुकीत फायदा घेण्यासाठी केला जाऊ नये. माध्यमांची भूमिका देखील अत्यंत महत्त्वाची आहे. माध्यमांनी सैन्यसंबंधी मुद्दे राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी निःष्पक्षपणे सादर करावेत. टीआरपी मिळवण्याच्या स्पर्धेत जर माध्यमेही लष्कराला 'राजकीय मसाला' बनवू लागली, तर त्यांना जबाबदेह धरायला हवे. नागरिकांनी हे समजून घेतले पाहिजे की सैनिकांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. राष्ट्रभक्ती केवळ नारेबाजीतून, घोषणांतून नाही, तर लोकशाही संस्थांचे रक्षण करून प्रकट होते. हे आपले सामाजिक उत्तरदायित्व आहे की आपण देशाच्या लष्कराला राजकारणापासून दूर ठेवायला हवे. तेव्हाच सैन्याचा झेंडा पावन राहील आणि त्याचे शौर्य अढळ राहील आणि याच मार्गाने लोकशाही सुद्धा सुरक्षित आणि बळकट राहील. सेना आणि राजकारण यांच्यातील रेषा ही एक मर्यादा आहे, जी आपल्या लोकशाहीच्या बळकटीचा पाया आहे. खरेतर ही रेषा म्हणजे लोकशाही आणि हुकूमशाही यांच्यातील अंतर आहे. जर आपण ही रेषा ओलांडली तर आपली लोकशाही दुर्बल होईल यात शंका नाही. आपले सैन्य ही एक पवित्र आणि सन्माननीय संस्था आहे, जिला आपण कोणत्याही परिस्थितीत राजकारणापासून दूर ठेवले पाहिजे. राजकारण्यांनीही हे समजले पाहिजे की राष्ट्रसेवा ही केवळ सत्ता मिळवून होत नाही, तर देशाच्या मूलभूत संस्थांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करूनही होते. म्हणूनच हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की कोणताही राजकीय पक्ष, नेते, नागरिक किंवा संस्था यांनी या मर्यादेचा भंग करू नये आणि लष्कराचा उपयोग आपल्या प्रचारासाठी करू नये. लोकशाहीची मर्यादा अबाधित राहावी, यासाठी हे अत्यावश्यक आहे. लष्कराला राजकारणापासून दूर आणि स्वतंत्र ठेवणे केवळ सरकारचेच नाही, तर प्रत्येक सजग नागरिकाचेही कर्तव्य आहे. यामध्ये सर्वांत महत्त्वाची भूमिका सामान्य नागरिकाची आहे. आपण हे समजून घेतले पाहिजे की फौज ही देशाची आहे, कोणत्याही राजकीय पक्षाची नाही. जेव्हा कुठलाही पक्ष सैन्याच्या नावावर मते मागतो, तेव्हा आपण निर्भयपणे प्रश्न विचारले पाहिजेत, हे योग्य आहे का? सैनिकांच्या बलिदानाचा वापर राजकीय फायद्यासाठी करणे न्यायसंगत आहे का? नैतिकदृष्ट्या योग्य आहे का? एका सशक्त लोकशाहीसाठी आवश्यक आहे की आपण लष्कराला राजकीय साधन बनवण्याचा, सत्ताधारी असो वा विरोधी पक्षांच्या सर्व प्रयत्नांचा शांततामय, संवेदनशील पण स्पष्टपणे विरोध केला पाहिजे. ■ ■

प्रा. अंबादास मोहिते
मो. 9422190871

# संघर्षातून गगन भरारी...

कृ आदिवासी अस्तित्व, अस्मिता जपून युगानुयुगे जीवनसंघर्ष करून जगणारा अतिप्राचीन समाज होय. आदिवासी समाज समूह हा साधाभोळा असून या देशाचा मूळधनी, मूळमालक आहे. भारत देशाचा स्वाभिमानाने जगणारा आदिवासी समाज हा देशाचा मूळ नागरिक आहे.

आदिवासी समाज समूह या देशाची अनेक शतके राज्य करणारी मूळ राज्यकर्ती जमाती समूह आहे. वर्तमानातही त्यांचे गढकिल्ले, राजवाडे, तथा संस्कृती याविषयीचे संदर्भ पहावयास मिळतात. मी जगदीश हरिभाऊ मडावी, सेवानिवृत्त केंद्रिय कर्मचारी असून मूळगाव भोजापूर, पोस्ट-बेला, ता. जि. भंडारा आहे. माझा जन्म दि. 01/12/1953 रोजी झाला. भंडारा शहराला लागून एका लहानश्या खेडेगावी (भोजापूर) येथे झोपडीत(गवताच्या) माझे बालपण गेले. ते बालपण आठवले की अंगावर काटे आल्यासारखे वाटते. माझे आई-वडील अत्यंत गरिबीचे जीवन जगत होते. वडील मोलमजूरीचे त्याकाळी काम करायचे. आई बीडी बनविण्याचे काम घरीच करीत होती. माझे आजोबा स्व. मिताराम लहानू मडावी भंडारा हे पितळी भांडे बनविण्यासाठी कामगार म्हणून काम करायचे. माझ्या वडिलांना एकच बहिण होती. गरिबीमुळे तिला शिकता आले नाही. माझे वडील भंडारा येथील अन्सारी प्राथमिक शाळेत फक्त चवथ्या वर्गापर्यंत शिकले होते. गरिबीमुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. भंडाराजवळ सावरी गावाला लागून जंगलात पहाडीला लागून एक आयुध निर्माणी कारखाना केंद्र सरकारचा आहे. एका कंत्राटदाराच्या साहाय्याने माझे वडील मजदूर म्हणून 1958-59 च्या कालावधीत कामाला लागले. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे माझे वडील कामगार म्हणून ऑर्डनन्स फॅक्टरी भंडारा, जवाहरनगर येथे काम करून लागले. त्यावेळी आयुध निर्माणी कारखाना सुरू करण्यासाठी लागणारा कच्चा माल रेल्वेने वरठी (भंडारा रोड स्टेशन) येथे येत असे. तो कच्चा माल भंडारा रोड वरील सुर नदीच्या काठावर ठेवायचा. तद्नंतर हा कच्चा माल मोठ्या ट्रकने(10 ते 12 चाके असणाऱ्या) लांबलचक ट्रक मध्ये लोड करून(कच्चा माल) जवाहरनगर येथे जमा करायचा. सर्वहारा कच्च्या सामानाची देखभाल माझे वडील इतर सहकाऱ्यांसोबत करीत होते. हे काम करीत असतांना कंत्राटदारांच्या माध्यमातून सन 1960 मध्ये लेबर म्हणून आयुध निर्माणी भंडारा येथे नियुक्त झाले. माझे बाबा भोजापूर खेडेगावावरून दररोज सायकलने ये-जा करीत होते. त्याकाळात तीन शिफ्टमध्ये काम करायचे. त्यावेळी पगार फक्त रू. 90/- (मासिक वेतन) मिळत असे. अत्यंत कठीण परिस्थिती घरची होती. घरात शैक्षणिक वातावरण नव्हते. माझ्या वडिलांनी मला भंडारा येथील अन्सारी प्राथमिक शाळेत शिक्षणासाठी दाखल केले. मी गावातील इतर मुलांसोबत शाळेत जात होतो. भोजापूरपासून भंडारा पायी जावे लागत असे. रस्ता त्यावेळी नव्हता, रस्त्यावरून चालतांना खूप त्रास व्हायची, अनेक अडथळे रस्त्यावर होते. मला शिक्षणात आवड होती. मी आनंदाने दररोज शाळेत जात होतो. मी 4 थ्या वर्गात प्रथम आल्याने पारितोषिक नगर परिषद तर्फे प्राप्त झाले. परंतु मला त्यावेळी विशेष काही समजत नव्हते. परंतु एक विशेष पारितोषिक प्राप्त झाल्याने खूप शिकावे आणि शिक्षणाविषयी अभिरूची वाढत गेली. पुढील शिक्षणासाठी 5 व्या वर्गात भंडारा येथील श्रीगणेश विद्यालय येथे नाव नोंदणी केल्याने दहाव्या वर्गापर्यंत शिकलो. दहावी उत्तीर्ण झाल्याचा आनंद आणि गुण बऱ्यापैकी प्राप्त झाले. मला विज्ञान विषयात आवड होती. परंतु त्याकाळात भंडारा येथे विज्ञान शाखा नव्हती. घरातील उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक पाठबळ आणि योग्य असे मार्गदर्शन करणारे कोणीही नव्हते. आर्थिक परिस्थिती बेताची होती. माझ्या लहान भाऊ तथा दोन बहिणी शिकत होते. त्यामुळे मला जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा येथे कला शाखेत प्रवेश घेऊन पदवी पर्यंत शिकता आले. शिक्षणाची भूक वाढत होती. मला उच्च शिक्षण म्हणजे एम.ए. करण्यासाठी आई-वडीलांनी मदत करण्याचे निश्चित झाले. त्यांच्या तुटपुंज्या आर्थिक मदतीमुळे मला पुढील शिक्षणाची दिशा प्राप्त झाली. नागपूर येथील नावाजलेल्या अमरावती रोडवरील पीजीटीडी कॅम्पस येथे लोकप्रशासन या विषयात एम.ए. यशस्वीरित्या चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो. माझी आवड शिक्षण क्षेत्रात असल्याने त्वरित बी.एड. केले. त्यानंतर त्वरीत मला आयुध निर्माणी, जवाहरनगर येथे लिपीक पदासाठी निवड झाली. नियुक्ती पत्र प्राप्त झाले. वडिलांची इच्छा मी नोकरी करावी व कुटूंबाला मदत करावी असे ठरल्यामुळे मला तो निर्णय मान्य करावा लागला.

आदिवासी अस्तित्व



प्रा. डॉ. वामन शेळमाके
9420973248

माझी उच्च शिक्षणविषयक इच्छा अपूर्ण राहिली. मला संशोधन करून प्रोफेसर व्हायचे होते. परंतु परिस्थितीमुळे तथा कुटूंबाचा भार असल्याने माझे उच्च शिक्षणाचे स्वप्न अधुरे राहिले. मी आयुध निर्माण भंडारा, जवाहरनगरे येथे नोकरी पत्करली आणि येथून माझा जीवन प्रवास सुरू झाला. मला केंद्र सरकारच्या ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये कार्य करतांना विविध पदावर कार्य करणारे अधिकारी, कर्मचारी मिळाले. त्यावेळी संपूर्ण राज्यातील विविध पदावर काम करणारे जवळपास दोनशे पन्नास कर्मचारी कार्यरत होते. मला शिक्षणात आवड होती, परंतु सामाजिक कार्यात अधिक रूची असल्याने नोकरी करून समाजासाठी काहीतरी सेवा करावी ही इच्छा माझ्या मनात सुरूवातीपासून होती. अधिकारी-कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे 'आदिवासी विकास समिती' या सामाजिक संघटनेची शासकीय नियमाप्रमाणे रजिस्ट्रेशन केले. आयुध निर्माणी जवाहरनगर, भंडारा येथे पूर्णकाळ नोकरी सांभाळून सर्वहारा समाजाच्या विकास व प्रगतीसाठी दरवर्षी 'मल्टीपरपझ हॉल' येथे वार्षिक उत्साहात समाजात शिक्षण तथा संरक्षण, कर्तव्याची जाणीव तथा प्रबोधन, शिकत असलेल्या मुला-मुलींसाठी विविध स्पर्धा आयोजित करून 'समाज प्रबोधन तथा उच्च शिक्षण' यावर भर देऊन समाजसेवेचे पर्यायाने देशसेवेचे काम निःस्वार्थपणे करण्याचे धाडस सर्वांच्या सहकार्याने पुर्णत्वास नेण्याचे कार्य मला करता आले याचा आनंद व समाधान आहे. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासाच्या प्रबोधनात्मक कार्य करण्यासाठी अनेकांचे हातभार मला लाभले. विविध क्षेत्रात सर्वोच्च उंच कामगिरी करणाऱ्या समाजसेवकांना, विचारवंतांना, सामाजिक नेते, उच्च पदाधिकारी यांना जवाहरनगर येथील वार्षिक उत्सवात आमंत्रण-निमंत्रण देऊन कर्तव्याचे पालन करून देशाच्या संरक्षण खात्यात जबाबदारी सांभाळून समाजहिताचे, समाजप्रबोधन युवा-युवतींच्या शिक्षणविषयक धोरणाविषयक चर्चा, संवाद, परिचर्चा, मेळाव्‍याद्वारा समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी कार्य करण्याचे संधी मला प्राप्त झाली. यशस्वीरित्या मी पार पाडली. उपरोक्त कार्यक्रमाला समाजातील उत्थानाचे कार्य करणाऱ्या विचारवंतांना 'समाज प्रबोधन सह उच्च शिक्षण', राष्ट्रसेवा, राष्ट्रहित जपून कार्य करणारे मान्यवर स्व. श्री. बाबुरावजी मडावी, माजी बांधकाम मंत्री ॲड. ज्योतीराव कोवे, स्व. रवि टोपनो, श्री. बाबासाहेब कंगाली (सेवानिवृत्त), राष्ट्रपती पुरस्कार विजेते प्रा. डॉ. विनायक तुमराम, सुविख्यात विचारवंत, नागपूर, श्री. एम. एस. भलावी, सायंटीफिक ऑफिसर, डॉ. वामन शेळमाके, विचावंत, कवी, श्री. कोडापे, माजी शिक्षणाधिकारी, स्व. आत्माराम वरकडे, स्व. पी. जी. वरकडे, लेबर ऑफिसर तथा आयुध निर्माणी, जवाहरनगरचे अधिकारी इत्यादी अधिकारी, कवी, लेखक, विचारवंतांना निमंत्रित करून 'वार्षिक उत्सव' दरवर्षी साजरा होत असे. याबद्दल यशस्वी नियोजनात संस्थापक अध्यक्ष मा. जगदीश हरिभाऊ मडावी यांचे योगदान महत्वाचे आहे. अथक परिश्रम घेऊन 'आदिवासी विकास समिती' संघटनाची बांधणी करून समाजाला एकत्रित करून 'समता तथा एकता' यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जगदीश मडावी होय. सेवानिवृत्त झाल्यानंतरसुद्धा अखंडपणे आदिवासी विकास समितीला मोलाचे मार्गदर्शन करीत असतात. त्यांना वाचनाची आवड असून ग्रंथ खरेदी करण्याचा छंद सेवानिवृत्त झाल्यानंतर सुद्धा अखंडपणे आदिवासी विकास समितीला मोलाचे मार्गदर्शन करीत असतात. त्यांना वाचनाची आवड असून ग्रंथ खरेदी करण्याचा छंद सेवानिवृत्ती झाल्यानंतर सुद्धा जोपासला आहे. विविध प्रकारच्या वैचारिक पुस्तकांचा संग्रह त्यांच्या घरी भेट दिली असता प्रत्यक्ष पाहता येतो. ग्रंथ वाचनाची त्यांची सवय वर्तमानातही कायम आहे. जगदीश मडावी यांना दोन मुले आहेत. मोठा पंकज, लहान आशिष. दोघांचेही लग्न झाले आहे. ओजस, हिरण्या व सानवी असे एक नातू व दोन नातीण असा कौटूंबिक सुखी परिवार असून त्यांचा समाजसेवेसाठी जीवन संघर्ष वर्तमानातही सुरू आहे हे विशेष. जीवन संघर्षाच्या प्रवासात त्यांच्या सहचारिणी सौ. ज्योती मडावी यांचे अथक निःस्वार्थ परिश्रम आणि योगदान तितकेच महत्वाचे आहे. सदैव त्यांच्या कार्यात सौ. ज्योती मडावी मनापासून सहकार्य करीत असतात. श्री. जगदीश मडावी यांच्या समाजकार्याची दखल घेऊन आफ्रोट संघटनेने दि. 9 मार्च 2025 रोजी शाल, श्रीफळ व रोख रू 11000/- देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. निसर्गशक्ती त्यांना व परिवाराला सुख, समृद्धी आणि शांती प्रदान करो ही प्रार्थना. सेवाभाव हा त्यांचा जीवनाचा मूळ आधारस्तंभ आहे. त्यांना निसर्गशक्ती उदंड आयुष्य देवो याकरिता नम्रपणे एकमेव प्रार्थना. ■ ■



जगदीश मडावी

# रत्नाकर गायकवाड बदनामीचे असंख्य वार झेलणारे



महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव व माजी मुख्य माहिती आयुक्त मा. रत्नाकर गायकवाड यांचा वाढदिवस नुकताच झाला आहे. त्यांच्याविषयी समाजात नाना प्रकारचे गैरसमज निर्माण करण्यात आले आहेत. त्यांना अपमानित करण्याची, बदनाम करण्याची मोहीम काही विशिष्ट लोकांकडून सातत्याने अद्यापही राबविण्यात येत आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्यावर शारीरिक हल्ला करून त्यांना व त्यांच्या पत्नीला मारहाण सुद्धा करण्यात आली होती. मात्र त्यांनी मोठ्या मनाने हल्लेखोरास माफ केले व पोलिसांनी स्वतःहून नोंदविलेला FIR मागे घ्यावयास लावला. नुकतेच त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुणे शहराजवळ 12 एकर जागेत एक नितांत सुंदर धम्म मॉनेस्ट्री प्रकल्प उभा केला आहे. भविष्यात आणखी जागा मिळवून अंदाजे 100 एकर जागेत हा प्रकल्प विस्तारण्यात येणार आहे. याबद्दल पुढे कधीतरी लिहिता येईल. मात्र त्यांच्याबद्दल पसरविण्यात आलेले गैरसमज खरेच वस्तुस्थितीवर आधारीत आहेत काय? किंवा निव्वळ द्वेषापोटी, ऐकीव माहितीवर आधारित पूर्वग्रहापोटी त्यांच्याबाबतीत बदनामीची मोहीम राबविली जाते यांची शहानिशा करणे आवश्यक आहे. त्यांच्यावरील आरोपात खरोखरच तथ्य असेल तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केलीच पाहिजे. अन्यथा वारंवार या विषयाला उगाळत बसू नये असे माझे मत आहे. रत्नाकर गायकवाड यांच्यावर असा आरोप केला जातो की, ते स्वतः आयएएस अधिकारी झाले, राज्याचे मुख्य सचिव झाले. मात्र त्यांनी समाजासाठी काहीही केले नाही. या संदर्भात वस्तुस्थिती अशी आहे की त्यांनी कोणाच्या वैयक्तिक हितांची जसे की बदली, बढती, नियुक्ती DE या स्वरूपाची मेरिट नसलेली कामे केली नाहीत हे खरे आहे. मात्र त्यांनी व्यापक सामाजिक हिताची कामे निश्चितच केली आहेत.

गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर गडचिरोलीचे प्रथम जिल्हाधिकारी म्हणून ते 1982 मध्ये या जिल्ह्यात रुजू झाले. या जिल्ह्याचे मुख्यालय बांधण्यापासून ते प्रशासनाची घडी नीट बसविण्यापर्यंत संपूर्ण कामे त्यांनी केली. मी नोव्हेंबर 1983 मध्ये कुरखेडा येथे पशुधन पर्यवेक्षक म्हणून नोकरीस लागलो. मी स्वतः अनुभवले आहे की, या काळात गडचिरोली जिल्ह्यात काम करायला कर्मचारी मिळत नव्हते. रत्नाकर गायकवाड साहेबांनी यासाठी मोहीम राबवून तेथील बौद्ध कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन नोकरीसाठी उमेदवार सुचविण्याचे आवाहन केले. त्यांनी सुचविलेल्या शेकडो लोकांना विविध विभागात वर्ग 3 च्या नोकऱ्या दिल्या. यामध्ये अनुसूचित जाती-जमाती व ओबीसी लोक मोठ्या संख्येत नोकरीस लागले. माझे कितीतरी नातेवाईक क्लार्क म्हणून लागले आणि पुढे, कार्यालय अधिक्षक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, तहसीलदार म्हणून निवृत्त झाले. हे लोक अजूनही रत्नाकर गायकवाड साहेबांना देवासमान मानतात.

समाजकल्याण संचालक म्हणून काम करताना त्यांचे महत्वपूर्ण योगदान म्हणजे अनुसूचित जातीसाठी 600 वस्तीगृहाचा बृहत आरखडा मंजूर करून घेणे व दरवर्षी किमान 50 वस्तीगृहे सुरू करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे हे आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी एकाच वर्षी 32 वसतिगृहे सुरू केली हा एक विक्रमच म्हणावा लागेल. आयाज महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या शासकीय वसतिगृहाचे जे जाळे पसरलेले दिसते त्याचे मुख्य शिल्पकार रत्नाकर गायकवाड आहेत.

पुढे ते मुख्य सचिव झाल्यानंतर त्यांनी अनुसूचित जातींच्या शासकीय वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये आमूलाग्र सुधारणा करण्याचा निर्णय घेतला व त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित केला. शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी केलेले हे काम अतुलनीय आहे. त्यांच्या समाजकल्याण संचालक पदाच्या कार्यकाळात त्यांनी बार्टी या संस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले व यशस्वी केले. बार्टी या संस्थेची नवीन इमारत बांधणीसाठी त्यांनी आराखडा तयार केला व पुढे समाज कल्याण सचिव झाल्यावर त्यांनी ही इमारत बांधून पूर्ण केली. बार्टी या संस्थेचे जे महत्व वाढले आहे त्याचा पाया रत्नाकर गायकवाड यांनी घातला आहे. समाजकल्याण सचिव म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी अनुसूचित जातींसाठी अत्यंत महत्वाची अशी वैमानिक प्रशिक्षण योजना महात्मा फुले विकास मंडळातर्फे सुरू केली, यातून अनुसूचित जातींचे अनेक पायलट तयार झाले. अनुसूचित जातींसाठी स्वतंत्र आश्रमशाळांना मंजूरी देण्याचा निर्णय त्यांच्याच कार्यकाळात त्यांनी मंजूर करून घेतला. अनुसूचित जातींच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेचा पाया त्यांनी घातला. या योजनेच्या संदर्भातील पहिली बैठक सन 1996 मध्ये सामाजिक न्याय खात्याचे सचिव म्हणून त्यांनी बोलाविली होती. या बैठकीस मंत्रालय मागासवर्गीय कर्मचारी अधिकारी कल्याण संघटनेचे अध्यक्ष मा. मधुकर एम. कांबळे व संघटनेचे अनेक पदाधिकारी हजर होते. त्यामध्ये मी सुद्धा होतो. या योजनेचा प्रारंभिक आराखडा त्यांनी तयार केला होता. मात्र पुढे त्यांची बदली झाल्याने ती योजना त्यांच्या कार्यकाळात पूर्ण होऊ शकली नाही. परंतु पुढे मा. सुशीलकुमार शिंदे राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर 2003 साली ही योजना सुरू झाली व आजमितीस शेकडो विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला आहे. अजूनही घेत आहेत. मात्र या योजनेची मूळ संकल्पना रत्नाकर गायकवाड यांची आहे याची कोणालाही आठवण नाही. खैरलांजीमध्ये जेव्हा भोंतमांगे कुटुंबियाचे निर्घृण हत्याकांड घडले त्यावेळी POA ॲक्ट अंतर्गत नोडल ऑफिसर म्हणून, रत्नाकर गायकवाड (तत्कालीन महासंचालक YASHADA) कार्यरत होते. त्यांनीही वैयक्तिकरित्या खैरलांजी गावाला भेट दिली. प्रत्यक्ष घटनास्थळाला भेट देणारे ते पहिले बौद्ध आयएएस अधिकारी होते. रत्नाकर गायकवाड व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी या घटनेच्या संदर्भात माहिती घेऊन एक अहवाल तयार केला. यात अनेक महत्वपूर्ण बाबी नमूद करण्यात आल्या होत्या व संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. हा अहवाल सरकारला सादर करण्याच्या आधीच यशदा वेबसाईटवर अपलोड करण्यात आला होता. हा अहवाल यशदाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आल्यामुळे पोलीस दलाची व सरकारची नाचक्की झाली आहे असा मुद्दा उपस्थित करून तत्कालीन महासंचालक नागरी हक्क संरक्षण कक्ष, श्री. राज खिलनानी तत्कालीन पोलीस महासंचालक यांनी प्रचंड संताप व्यक्त केला. यामुळे मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात तातडीने बैठक बोलावून रत्नाकर गायकवाड यांना प्रत्यक्ष हजर राहण्याच्या सूचना दिल्या. या संदर्भातील पत्र गृह विभागाकडून पाठविण्यात आले होते. हे पत्र मी स्वतः ड्रॉफ्ट केले व त्यावर गृह विभागाचे तत्कालीन अप्पर मुख्य सचिव श्री. मुखोपाध्याय यांची सही घेऊन फॅक्सने रत्नाकर गायकवाड यांना पाठविले. (त्यावेळी मी गृह विभागात मागासवर्गीय अत्याचार प्रतिबंध कक्षाचा कक्ष अधिकारी होतो.) यासंदर्भात मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत रत्नाकर गायकवाड यांना तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि गृहमंत्री आर. आर. उर्फ आबा पाटील यांनी प्रचंड अपमानित केले. त्यांनी आपला अहवाल यशदाच्या वेबसाइटवरून तात्काळ काढावा, सरकारकडे लेखी माफी मागावी, तसेच पोलीस महासंचालक यांचीही माफी मागावी असे त्यांना बजावण्यात आले. रत्नाकर गायकवाड यांनी यावेळी आपण कोणतीही चूक केली नसल्याचे बैठकीत सांगितले. मात्र अहवालातून मृत व्यक्तीची मरणानंतरही विटंबना चालू ठेवणे उचित नाही, या सबबीखाली अहवालातून मृतदेहाचे फोटो काढून टाकण्यास तयारी दर्शविली. मात्र सरकारने संपूर्ण अहवालच यशदाच्या वेबसाइटवरून हटविण्यास सांगितले. रत्नाकर गायकवाड यांनी आपण आपले कायदेशीर कर्तव्य बजावल्याचे सांगून अहवालाबाबत सरकारची व पोलीस महासंचालकांची लेखी माफी मागण्यास नकार दिला. यानंतर नोडल अधिकारी म्हणून त्यांच्यावर देण्यात आलेली जबाबदारी सरकारने काढून टाकली. त्यांची नियुक्ती झालेल्या बहुतेक ठिकाणी त्यांनी स्थानिक लोकांना सहकार्य करून बुद्ध विहारे ई. बांधण्यास हातभार लावला आहे. सोलापूर येथील भव्य बुद्ध विहाराचे बांधकाम त्यांच्या पुढाकारामुळे पूर्ण झाले. देहू रोड येथील बुद्ध विहाराचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. मात्र, काही हितशत्रुंनी त्यात खोडा घातला. त्यामुळे अजूनही हे काम पूर्णवस्थेत येऊ शकलेले नाही. गोराई येथील जगप्रसिद्ध विपश्यना पॅगोडा बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करून घेणे, रस्ता बांधणे, विविध प्रकारच्या शासकीय मंजूरी मिळवणे, निधी संकलन करणे इत्यादि स्वरूपात त्यांचा जवळपास 80 टक्के वाटा आहे. रत्नाकर गायकवाड यांना आंबेडकर भवन पाडण्यास जबाबदार धरून त्यांना प्रचंड बदनाम करण्यात आले. त्यांच्यावर शारीरिक हल्लासुद्धा करण्यात आला. मात्र या प्रकरणाची सत्य आणि कायदेशीर वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा कोणीही प्रयत्न केला नाही. (ज्यांना सत्य आणि कायदेशीर वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेण्यात इंटरेस्ट असेल त्यांना संपूर्ण वस्तुस्थितीची माहिती देणारा PDF दस्तावेज पुरविण्यात येईल.) वास्तविकतः त्यावेळी लोकांनी खोट्या अफवांवर विश्वास ठेऊन भावनिक उद्रेक केला नसता तर आज पूर्णतः समाजाच्या मालकीची आंबेडकर भवनाची 17 मजली भव्य वास्तु उभी राहिली असती. ही वास्तू उभी राहावी यासाठी BARTI या संस्थेला इमारतीतील दोन मजले 30 वर्षाच्या लिजवर देऊन त्यांच्याकडून जवळपास 70 कोटी रुपये घेण्याचे तत्वतः मान्य करण्यात आले होते. शासनाने 10 कोटी रुपये मंजूर केले होते. निधीची ही जमवाजमव रत्नाकर गायकवाड यांच्या प्रयत्नातून झाली होती. मात्र काही हितशत्रूंनी चुकीची, धादांत खोटी माहिती पसरवून यात रत्नाकर गायकवाड यांना जाणीवपूर्वक बदनाम करून पूर्णतः समाजाच्या मालकीची इमारत बांधण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण होऊ दिले नाही. मा. रत्नाकर गायकवाड बदनामीचे असंख्य वार झेलत आज वयाच्या 72 व्या वर्षीही तेवढ्याच उत्साहाने समाजकार्यात आणि धम्मकार्यात मग्न आहेत. त्यांना बळ मिळो आणि उत्तम दीर्घायुरारोग्य लाभो हीच सदिच्छा ! ■ ■



सुनील खोब्रागडे
मो. 9594057373

“ जीवनात मूल्ये जपल्यास खऱ्या अर्थाने यशस्वी होता येते. ”



# प्रौढ होणाऱ्या मुलास बापाचे अनावृत्त पत्र

*प्रिय बाळा, आज तुझा जन्मदिवस. तू आज वयाचे 18 वर्षे पूर्ण करून प्रौढावस्थेत प्रवेशित आहेस. त्यानिमित्त तुला भरभरून मंगल कामनासह शुभाशिष. आज तुझ्या जन्मदिवसानिमित्त बोलून दाखवत असलो, तरी बापाचे आशीर्वाद सदैव मुलाच्या पाठी असतातच यात मात्र शंका नाही.*

आज तू प्रौढ होत आहेस; याचा आनंद तर आहेच. परंतु काहीसे मनावर भीतीयुक्त दडपण सुद्धा आहे. त्याचे कारण असे की, आता तू प्रौढ झाला म्हणजे नाबालिक राहिला नाहीस. हे समजून घेण्यास तू थोडा जरी कमी पडलास, तर काही प्रश्न निर्माण होऊन, तुझे जीवन उध्वस्त आणि वेळप्रसंगी कुटुंबाचीही राखरांगोळी करू शकतात. नाबालिक नसणे म्हणजे प्रौढ होणे. प्रौढ होणे म्हणजे तुझ्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाला समाज मान्यता मिळणे. स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणजे देशाचा नागरिक म्हणून तुला संविधानिक दर्जा प्राप्त होऊन मतदार यादीमध्ये तुझे नाव समाविष्ट होईल. मतदार यादी म्हणजे देशाचा सातबारा होय. त्यामध्ये नाव म्हणजे तू देशाचा मालक. याचा अन्वयार्थ असा की, मालकांनी मताधिकाराच्या माध्यमातून जे प्रतिनिधी कायदेमंडळात पाठवले ते लायक (योग्य) आहेत की नाही? याची चाचपणी तुला उघड्या डोळ्यांनी करता आली पाहिजे. अन्यथा पुनरसंधी नाकारून त्यांना घरचा रस्ता दाखवता आला पाहिजे. असे जर झाले नाही, तर लोक तुला अंधभक्त म्हणून हीनवतील आणि बाप म्हणून ते मला अजिबात चालणार नाही. कदाचित तू नेमकाच प्रौढ झाल्यामुळे तुला लायकीची कसोटी करणार नाही. त्यासाठी भारतीय संविधान तुला मदत करेल. त्यामधून तुझे अनेक संबोध स्पष्ट होतील. संविधान सर्वच समजून घेता आले नाही, तरी सुरुवातीला तिसऱ्या, चौथ्या प्रकरणातील नागरिकांचे मूलभूत हक्क-अधिकार व नीती निर्देशक तत्व हा त्याचा गाभा तू समजून घ्यावा. त्यानुसार आपले प्रतिनिधी नागरिकांचे हक्क अधिकार साबुत ठेवून त्यामध्ये त्यांनी किती वृद्ध केली? त्यांच्या व्यक्तिमत्त्व उत्थानासाठी व आदर्श जीवनमान उंचावण्यासाठी किती काटेकोर व धाडसी पाऊले उचलून निर्णय घेतले? याचे मोजमाप करता आले, म्हणजे इतर बाबी तुला समजून समजून घेण्यास वेळ लागणार नाही.



माझ्या लाडक्या मुला, मला भीती याही गोष्टीची वाटते की, तू प्रौढ झाल्यामुळे भारतीय दंड संहिता आणि न्यायसंहितेचे कायदे तुझ्यावर तंतोतंत लागू होतील. आधी मोटर सायकल चालवताना चूक झाली, तर गुन्हा बापावर दाखल होण्याचा नियम आहे. इतर काही चुकांसाठी 'नासमज' किंवा एका प्रतिष्ठित बापाचा मुलगा म्हणून दुर्लक्ष होत होते. परंतु आता तसे होणार नाही. चूक ही अनवधानाने झाली, तरी ती चूकच ठरणार आहे. तिथे बापाची प्रतिष्ठा कामी न येता उलट तीच पणाला लागणार आहे. आतापर्यंत तुझ्या बापाच्या यशाचे स्वतंत्र मोजमाप होत होते. त्याचे श्रेय बापाच्या बापाला जात होते. परंतु आता त्याचे मूल्यमापन तुझ्या यशावर अवलंबून असणार आहे. तू जर नैतिकता जोपासून यशस्वी झाला तर बापाचे सत्कर्म फळाला आले, अन्यथा स्वतः मोठे झाले आणि मुलांना संस्कार देण्यात कमी पडले.



**भिमराव परघरमोल**
**9604056104**

काय गरज आहे समाजकार्याची? असे बोलताना समाजाची जीभ थोडीही कचरणार नाही. समाज चुकीचा असतो असे मी म्हणणार नाही. ती पूर्वापार रीत आहे. ती बदलता येणार नाही. परंतु जगात बापच असा असतो की, त्याला वाटते माझा मुलगा माझ्यापेक्षा कितीतरी मोठा व्हावा आणि त्या दिशेनेच त्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठाही असते.

मानसशास्त्र म्हणते की, मुलाच्या व्यक्तिमत्व विकसनात साठ टक्के वाटा हा बाह्य परिसराचा, सभोवतालच्या वातावरणाचा असतो. म्हणून तू समाजात वावरताना राजहंसा प्रमाणे असावे. पाणी आणि क्षीर वेगळे करून, योग्य ते जवळ ठेवावे; फोलपट फेकून द्यावे.

जीवनात तुला मित्र असावे. मित्रांमुळे जीवन सुसह्य होते. परंतु त्यांना पारखता आले पाहिजे. अडीच हजार वर्षांपूर्वी बुद्धाने सांगितलेली मित्राची व्याख्या तुला माहीत असावी. जेणेकरून तुझी फसवणूक होणार नाही. बुद्ध फक्त मित्रापुरताच तुला मार्गदर्शन करतो असे नाही, तर प्रत्येक पावलागणिक तो तुझ्यासोबत असावा. आदर्श जीवनाचा मापदंड त्याच्याशिवाय जगात कोणाकडेच नाही. अभ्यासाबद्दल मी तुला एवढे सांगेल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समजून घेताना तू 'विद्यार्थी बाबासाहेब' नक्की अभ्यासावे. त्यामुळे ज्ञानलालसा आजन्म तुझी साथ सोडणार नाही. जीवनात पैसाच सर्व काही नसला, तरी बरेच काही आहे. याची जाण तुला असावी. त्याची किंमत तुला कळली पाहिजे. बापाच्या कमाईत भर टाकता आली नाही तरी चालेल. परंतु ती सुरक्षित ठेवण्याइतपत कौशल्य तुझ्याकडे असावे. जेणेकरून तुला सुपुत्र होता आले नाही, तरी तू कुपुत्र न होता, पुत्र होशील. समाजात वावरताना प्रत्येक पावलागणिक तुला लुबाडणारी, फसवणारी, जोपासणारी तसेच जीव लावणारी लोकं भेटतील. फसवी लोक फारच हुशार असतात. त्यांच्या तोंडात साखर आणि पोटात आग असते. त्यांच्या पोटातील आगीची भनक तुला त्यांच्या श्वासातून झाली पाहिजे, अन्यथा होरपळल्याशिवाय गत्यंतर नसते. बाळ तुला आदर्श जीवनाची वाटचाल करायची आहे. त्यासाठी तू आपल्या उद्धारकर्त्या महापुरुषांचे कष्ट, त्याग, समर्पण तुला समजून घ्यावे. त्यांच्याकडून तुला सद्गुन व निर्व्यसनी जीवनाचे धडे मिळतील. त्यामुळे तुला सुखी जीवनाचे रहस्य आणि सार कळेल. पर्यायाने तुझ्यात कृतज्ञता निर्माण होईल. ती सर्वव्यापी असेल, त्यामध्ये कुटुंबासह सर्व समाज सामावलेला असेल. खूप मोठी नोकरी किंवा पॅकेज म्हणजे यशस्वी जीवनाची मोजपट्टी नसते. ते जीवन जगण्याचे एक साधन आहे. त्यासोबत तुला समाजामध्ये ताठ मानेने शुरसैनिक म्हणून जगता आले पाहिजे.

बाळा मला माफ कर, प्रौढावस्थेच्या पायरीवर आरूढ होताच, मी तुला खूप साऱ्या सूचना करत आहे. खूप अपेक्षाही तुझ्याकडून ठेवत आहे. परंतु काय करू, शेवटी माझे काळीज हे बापाचा आहे. बाप हा नारळासारखा वरून टणक आणि आतून मऊ व पोषक असतो. आज जर तुला सूचना केल्या नाही, तर हे शल्य शेवटपर्यंत बोचत राहील.

पूर्वी केलेल्या सूचना तुझ्या अल्लडपणामुळे ती तुला कटकट वाटली असेल. म्हणून त्याचे गांभीर्य तुला कळले नसेल. यापुढे तुझे पंख विस्तारतील, त्यामुळे कदाचित तुझ्याकडे तेवढा वेळ नसेल. म्हणून आजची योग्य वेळ साधून मन, मोकळे करण्याचा प्रयत्न मी केला आहे. हे फक्त माझे रुदन नव्हे तर जगातील प्रत्येक बापाचे आक्रंदण आहे. ते तू समजून घेऊन आपल्या बापाच्या आयुष्याच्या मरणकळा सुसह्य करशील, अशी अपेक्षा बाळगतो आणि तूर्तास थांबतो. ■ ■

## अनंतायन



**ॲड. अनंत खेळकर**
**मो. 9370061677**

### देवदुत

झोपडपट्टीत राहणारे ते कुटुंब. त्यांचे वडिल एका ठेकेदाराकडे हमालीचे काम करायचे, तर आई दुसऱ्यांच्या घरी धुणेभांडी करून संसाराचा गाडा हाकत होते. यंदा कॉलेजच्या प्रवेशाची शेवटची तारीख जवळ येऊनही त्याने अर्ज भरला नसल्याने त्याच्या मित्राने त्याला कॉलेजमध्ये बोलावले. ते दोघेही महाविद्यालयाच्या एका वर्गाच्या बाहेर उभे असताना, त्याचा मित्र म्हणाला, 'तू अजून ॲडमिशन फॉर्म का भरला नाही?' त्यावर हा म्हणाला, 'आता शिक्षण बंद करायचा विचार करतोय.'

मित्र म्हणाला, 'पण का?' 'ॲडमिशन फी चे पैसे बघून बाबांचे डोळे पांढरे होतील. कुठुन आणायचे एवढे पैसे?'

'तू म्हणतोस ते बरोबर आहे. माझीही तशीच अवस्था आहे, पण बाबांनी थोडी उसनवारी करून पैसे जमवले.' 'तू काहीही म्हण गड्या, पण माझे मत असे आहे की, आपण गरीब आहोत हे सत्य आहे. तरीही आईच्याजवळ असलेला एखादा छोटासा दागीना विकून अन् बापाच्या घामाला गहाण ठेवून शिक्षण घेणे मला मुळीच पटत नाही रे.' त्यावर मित्र उत्तरला, 'पण दुसरा काय इलाज आहे?' तो म्हणाला, 'तुला सांगतो. ज्या दिवशी ठेकेदाराकडून काम मिळत नाही, त्या दिवशी बाबा जेव्हा घरी येतात तेव्हा मोलमजूरी करूनही जेवढे ते थकत नाहीत, त्यापेक्षा कितीतरी पटींने ते काम न मिळाल्यामुळे थकलेले दिसतात.' 'माझ्याही मनाला खूप वेदना होतात. आपल्यासारख्या गरीबांची कितीतरी दुःखे अशी आहेत की, त्या दुःखांना आवाजच नाही.' 'बाबा अन्नधान्याचे पोते डोक्यावर घेऊन ठेकेदार सांगतो तेथे पोहचवतात. तेव्हा असे वाटते. बाबा ते पोते पोहचवतात. त्याच वेळी ते भरडल्या गेलेले असतात आणि ठेकेदार त्यांच्या गरिबीचा फायदा घेऊन, कमीत कमी मजुरी देऊन. दररोज थोडा थोडा खाऊन टाकत असतो.' 'माझ्या बाबांचेही तसेच आहे. लोकांना दिसतात ते फक्त गरीबांचे लटपटणारे पाय, पण कुणालाही त्यांच्या डोक्यावर किती ओझे लादल्या गेले हे बघण्याची फुर्सत नाही.'

'माझे बाबा म्हणतात, बाळा! आम्ही रक्ताचे पाणी करू पण तू शिक, आमच्या नशिबी जे जिणे आले ते तुझ्या नशिबी येऊ नये, हीच आमची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.'

डोळ्यांतील अश्रूंना पुसत तो म्हणाला, 'काय आयुष्य आहे बघ गरीबाचे, त्यांची आशा कधीही मरत नाही. ते अशा प्रतिकूल परिस्थितीत फक्त तिला झोपवण्याचा प्रयत्न करतात. कारण या जगात फक्त झोप अशी गोष्ट आहे की, जी दुःखातही सुख देते.' त्यावर त्याचा मित्र म्हणाला, 'मग आता तू पुढे काय करणार?'

'कुठेतरी एखादी छोटीमोठी नोकरी. दुसरे काय? थोडे पैसे मी जमवतो. फी पूरते पैसे जमले की पुन्हा प्रयत्न करील. पण त्यामुळे तुझे वर्ष वाया जाईल.' 'त्याला काहीही इलाज नाही. हे बघ फक्त काही स्वप्नांच्या मृत्यूने आयुष्य मरत नसते.' त्या दोघांमधील संवाद वर्गाच्या आत असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य ऐकत होते. ते त्यांच्याजवळ येऊन म्हणाले, 'कुणालाही शिक्षण सोडायची आवश्यकता नाही. तुम्ही दोघेही केवळ हुशारच नाही तर होतकरूसुद्धा आहात. मी आपल्या मॅनेजमेंटशी बोललो. ते तुम्ही जोवर शिकत राहाल तोपर्यंत तुमच्या शिक्षणाच्या खर्चाचा भार उचलायला तयार आहेत. दुःख आणि समस्या रडल्याने किंवा निराश होऊन बसल्याने कमी होत नाही, त्यासाठी शोधायचे असते ते त्यांचे कारण. आम्ही ते कारण शोधले. चला! पटकन फॉर्म भरून द्या! कुणीही काहीही बोलायचे नाही. आभार मानायचे नाहीत. चला जा!'

नकळत दोघांचेही हात प्राचार्यांच्या पायाला टेकले. दोघांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू तरळत होते. अचानक त्या दोघांचेही लक्ष महाविद्यालयाच्या भिंतीवरील सुविचार फलकाकडे गेले. त्यावर लिहिलेले होते, 'किसी मजबूर का हाँथ थाम ले वहीं खुदा का सच्चा बंदा है। किसी को दुख में देखकर मदद करे समझो उसमें इंसानियत जिंदा है। जिस किसी का दिल जरूरतमंदों की मदद के लिए तरसता है।

खुदा भी अपने रहमतों के फुल उस फरिश्ते पर बरसता है।' ■ ■




# जातीअंत की जाती पुरुज्जीवन ? (भाग -4)

*(चेन्नई, तामीळनाडू येथे 1 मे 22 रोजी संपन्न झालेल्या सामाजिक न्याय परीषदेत निर्मंत्रित वक्ते प्रा. श्रावण देवरे यांचे भाषण झाले. या इंग्रजी भाषणाचा मराठी अनुवाद लेखस्वरूपात देत आहोत. कार्यक्रमात वेळेचे बंधन असल्याने भाषण संक्षिप्तच करावे लागते. मात्र अनेक हितचिंतकांनी विनंती केली की, हे भाषण लेखस्वरूपात सविस्तर लिहावे. त्यांच्या विनंतीवरून हे भाषण विस्तारीत केले असून आपल्या वाचकांसाठी सादर करीत आहे. - संपादक)*

त्या काळात (1989) आम्ही मात्र आमच्या ताकदीच्या परीने महाराष्ट्रातील धुळे-नंदुरबार जिल्ह्यात असा ''अब्राम्हणी सांस्कृतिक संघर्ष'' उभा करण्याचा प्रयत्न केला. सुप्रसिद्ध प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील 2 यांच्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली धुळे शहरातून सीता, शंबुक, ताटका, शूर्पणखां व एकलव्याच्या प्रतिकांच्या मिरवणूका काढून त्यांच्या गौरवार्थ जयजयकार व जिंदाबादच्या घोषणाही दिल्यात. तसेच या मोर्च्यात राम, कृष्ण, द्रौणाचार्य आदि ब्राम्हणी प्रतिकांच्या विरोधात मुर्दाबादच्या घोषणा दिल्यात. मोर्च्याच्या शेवटी शहरातील मध्यभागी असलेल्या राणा प्रताप चौकात सभा झाली व कॉ. शरद पाटील यांनी जनतेला मोर्चा काढण्यामागील उद्देश सांगीतला. कॉ. पाटील यांनी ऐतिहासिक पुराव्यांसकट राम-कृष्णाविरोधातील शंबुक, एकलव्य, कर्ण, सीता, ताटला, शुर्पणखां यांनी दिलेल्या सांस्कृतिक संघर्षाचा इतिहास जनतेसमोर मांडला. या मोर्च्याचे अनुकरण करून कांशीराम, आठवले, प्रकाश आंबेडकर, लालू-मुलायम, भुजबळ यासारख्या राष्ट्रीय दलित-ओबीसी नेत्यांनी त्या काळात (1989-90) देशव्यापी आंदोलन उभे केले असते तर 2014 साली संघ-भाजपाची ब्राम्हणी प्रतिक्रांती झाली नसती व या दलित-ओबीसी नेत्यांवर आज भाजपाचे ''सालदार'' बनण्याची पाळी आली नसती.

जातीअंतासाठी सांस्कृतिक संघर्षाचा सिद्धांत सर्वात प्रथम मांडला तो तात्यासाहेब महात्मा जोतीराव फुले यांनी! देशाच्या इतिहासाची पुनर्मांडणी करतांना तात्यासाहेब म्हणाले- 'बळीराजाच्या पतनानंतरचा भारत देशाचा इतिहास ब्राम्हणी-अब्राम्हणी संघर्षाचा इतिहास आहे' त्याच वेळी युरोपमध्ये कार्ल मार्क्स नावाचा क्रांतिकारक तत्वज्ञानी जगाच्या इतिहासाची पुनर्मांडणी करतांना म्हणतो- ''प्राथमिक साम्यवादी गण समाज नष्ट झाल्यानंतर जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा आहे.'' मार्क्सचा ''द्वंदात्मक ऐतिहासिक भौतिकावाद'' हा सिद्धांत एकप्रवाही (वर्गवादी) आहे तर तात्यासाहेब महात्मा फुले यांनी सिद्ध केलेला ''भारताचा 'द्वंदात्मक ऐतिहासिक भोतिकवाद'' हा बहुप्रवाही 3 आहे. त्यासाठी त्यांनी दशावताराचे वैज्ञानिक विश्लेषण केले. दशावतार म्हणजे विष्णूने प्रत्येक युगात घेतलेले वेगवेगळे अवतार होते. विष्णूने वेगवेगळ्या युगात एकूण दहा अवतार घेतल्याचे पुराण सांगतात. या प्रत्येक अवताराची कहाणी म्हणजे 'ब्राम्हणी-अब्राम्हणी' युद्धाचा इतिहास होय! ब्राम्हणांनी पुराण-इतिहासात लिहिलेल्या या दहा युद्धांमध्ये बहुजनांना पराभूत व ब्राम्हण अवतारांना विजयी दाखविले आहे. शेकडो वर्षांपासून हा इतिहास बहुजनांच्या मेंदूवर बिंबवला गेला व जाणीवेतून नेणीवेत गेला. त्यामुळे बहुजन समाज शेकडो वर्षांपासून आजपर्यंत 'पराभूत' मानसिकतेत जगतो आहे.

### आजचा कळीचा प्रश्न



**प्रा. श्रावण देवरे**
**मो. 7588072832**

तात्यासाहेबांनी संशोधन करून या इतिहासाचे पुनर्लेखन केले व भारताचा द्वंदात्मक ऐतिहासिक भौतिकवाद सिद्ध केला. रामाच्या विरोधात शंबूक-रावण, द्रौणाचार्य, परशूराम व कृष्णाच्या विरोधात कर्ण-एकलव्य अशाप्रकारे प्रतिकांचा सांस्कृतिक संघर्ष त्यांनी मांडला. भावी काळात कोण्या एखाद्या ब्राम्हणाने शिवाजी महाराजांना 'गोब्राम्हण-प्रतिपालक' बनवून त्यांचे ब्राम्हणीकरण करू नये म्हणून तात्यासाहेबांनी 35 पानी प्रदिर्घ ऐतिहासिक पोवाडा लिहून शिवाजी महाराजांना आधीच ''शूद्रादिअतिशूद्र 'रयतेचा राजा' म्हणून सिद्ध करून ठेवले. भावी काळात भाद्रपद महिन्यात ढेरपोट्या ब्राम्हणी गणपतीचे स्तोम माजवून क्रांतिकारक बळीराजाचे व पितृपक्षाचे महत्व कमी केले जाऊ शकते, अशी शक्यता लक्षात घेऊन तात्यासाहेबांनी आधीच विविध ग्रंथांमधून भाद्रपद महिन्यातील पितृपक्ष व या पितृपक्षात आर्य-वामनाच्या विरोधात बळीराजाने पुकारलेल्या महाभारतीय युद्धाचा इतिहास लिहून ठेवला. पितृपक्ष, श्राद्ध पक्ष, नवरात्रौत्सव, भंडारा, दसरा, बलीप्रतितदा (दिवाळी) आदि ब्राम्हणविरोधी रूढी-परंपरा व त्यामागील बहुजनांचा क्रांतिकारक इतिहास तात्यासाहेब महात्मा फुले यांनी लिहून ठेवला. असा सांस्कृतिक संघर्ष इतिहासाच्या व पुराणांच्या पानापानावर आपणास दिसतो. त्याची सूत्रबद्ध ऐतिहासिक मांडणी तात्यासाहेबांनी, पेरियार साहेबांनी व डॉ. बाबासाहेबांनी करून ठेवलेली आहे. जेणे करून बहुजनांच्या भावी पीढ्या या इतिहासातून सांस्कृतिक संघर्षाची प्रेरणा घेतील व जातीअंताची लढाई सुरू ठेवतील, अशी साधी अपेक्षा तात्यासाहेब व डॉ. बाबासाहेबांनी बाळगली होती. परंतू फुले-आंबेडकरांच्या अनुयायांना त्यांच्या आरक्षणाच्या सिद्धांतापलिकडे काही दिसतच नाही. कारण आरक्षणामुळे चांगल्या नोकऱ्या व सुंदर छोकऱ्या मिळतात. सुंदर बायको, लाडकी पोरे, महागडी गाडी, प्रशस्त विशाल बंगला या पलिकडे तात्यासाहेब-डॉ. बाबासाहेब आणखी बरेच काही सांगून गेले आहेत, हे अनुयायांच्या ध्यानी-मनीसुद्दा नाही. अर्थात अनुयायांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही. कारण त्यांच्या दलित-ओबीसी नेत्यांनी फुले-आंबेडकरांना ब्राम्हण-मराठ्यांच्या दारात गहाण ठेवले आहे. ब्राम्हणी छावणी मात्र सातत्याने या अशा एकतर्फी सांस्कृतिक संघर्षातून विजयी होत आली आहे व आजही विजयी होत आहे आणि अब्राम्हणी छावणी मात्र या सांस्कृतिक संघर्षाच्या अभावात पराभूततेचे जीवन जगत आली आहे. फुले-आंबेडकरांनी बहुजनांना सतर्क केल्यानंतरही ब्राम्हणी छावणी संपूर्ण देशाचे ब्राम्हणीकरण करण्यात यशस्वी झालेली आहे. तामीलनाडू मात्र याला अपवाद आहे. सामी पेरीयार यांच्या नेतृत्वाखालील 1925 पासून सुरू झालेली सांस्कृतिक चळवळ 1967 साली राजकीय क्रांतीत यशस्वीपणे परावर्तित झाली. याची सुरूवात सामाजिक चळवळीपासून झाली. 1916 साली तत्कालीन ओबीसी नेते डॉ. सी. नतेशा मुदलियार, पी. थेगाराया चेट्टी व टी. एम. नायर यांनी जस्टीस पार्टीची स्थापना केली. या पार्टीचा मुख्य अजेंडा होता- ''सर्व नॉन-ब्राम्हीण जाती-धर्माच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळविणे.''

आदिवासी, अस्पृश्य, ब्राम्हणेतर जाती (म्हणजे आजच्या ओबीसी जाती), मुस्लिम, ख्रिश्चन, लिंगायत आदि सर्व नॉन-ब्राम्हीण जाती-धर्मात येतात. 1919 सालापासून मॉटेंग्यु चेम्सफर्ड सुधारणा अमलात आल्यानंतर प्रांतिक असेंब्ली स्थापन करण्यासाठी 1920 साली निवडणूका घेण्यात आल्यात. या पहिल्याच सार्वत्रिक निवडणूकीत जस्टीस पार्टी बहुमताने विजयी झाली व मद्रास प्रांतात पहिले सरकार जस्टीस पार्टीचे स्थापन झाले. देशाच्या आधुनिक काळातील पहिले ओबीसी-बहुजन सरकार मद्रास प्रांतात अवतरले. अकाराम सुब्बारॉयलू रेड्डी हे पहिले ओबीसी मुख्यमंत्री झालेत.

सरकार स्थापन होताच जस्टीस पार्टीने 16 सप्टेंबर 1921 रोजी आरक्षणाचा कायदा मंजूर केला. या कायद्याप्रमाणे 44 टक्के आरक्षण ब्राम्हणेतर (ओबीसी) जातींना देण्यात आले. 16 टक्के आरक्षण ब्राम्हण जातींना, 16 टक्के मुस्लीम, अँग्लो इंडियन्स, आदि-द्रविड व ख्रिश्चन धर्मियांना देण्यात आले. 8 टक्के आरक्षण अस्पृश्य जातींना देण्यात आले.

मात्र या आरक्षण कायद्याला कोर्टाकडून त्वरीत स्थगिती आली. गर्भ धारणा होण्याआधीच गर्भपात घडवून आणण्यात ब्राम्हणांना यश आले. ■ ■

# विवाह संस्था व आनुवंशिक विकार

जवळच्या नात्यात निर्माण होण्यापूर्वी म्हणजे आदिम काळात मनुष्यप्राण्यात इतर प्राण्यांप्रमाणे रक्ताच्या नात्यात शारीरिक संबंध प्रस्थापित व्हायचे, कालौघात अशाप्रकारचे संबंध प्रस्थापित होणे बंद झाले असले तरी ते पूर्णतः बंद झालेले नाहीत. आजही खासकरून महाराष्ट्रात मामाची मुलगी-आत्याचा मुलगा यांच्यात विवाह होत असतात. दक्षिण भारतात तर मामा भाचीचेही विवाह होतात. तसेच इस्लाम धर्मात चुलत भाऊ-बहिणीच्या विवाहाची परंपरा आहे. याशिवाय कुटुंब अंतर्गत झालेला अतिप्रसंग यातून गर्भधारणा झाली तर अपत्यात अनुवांशिक आजार व आरोग्य विषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता जास्त असते, असे संशोधनअंती सिध्द झाले आहे. रक्ताच्या नात्यामध्ये लग्न करण्यास धर्म आणि कायदा यांची मान्यता असल्यामुळेच भारतात जवळपास 25 टक्के लग्न ही रक्ताच्या नात्यामध्ये होतात. (गोत्र म्हणजे एकाच गुरू-शिष्य परंपरेतील मानस बंधुत्व, त्यांचा रक्ताच्या नात्याशी काहीही संबंध नसतो.) जवळच्या नात्यातल्या व्यक्तींशी विवाह केल्यास जन्माला येणारे मूल जन्मापासूनच एखाद्या भयानक आरोग्य विषयक समस्येने ग्रस्त अथवा अपंग असू शकते. कारण त्या दोघा विवाहितांमध्ये एकाच पूर्वजाची चांगली/वाईट गुणसूत्रे/जनुके आलेली असतात. त्यामुळे त्यांनी एकमेकांशी विवाह केल्यावर त्यांच्या मुलांमध्ये दोन्ही प्रकारची गुणसूत्रे दुप्पट होऊन अनुवांशिक आजार होण्याचा धोका दुप्पटीने वाढतो.




**'एकसंध विवाह' (consanguineous marriage)** - जवळच्या नात्यामधील विवाहांना वैद्यकीय भाषेत एकसंघ विवाह असे म्हणतात. त्यात तीन प्रकार आढळून येतात.

**प्रथम चरण विवाह (first degree marriage)** - काका, मामा, पुतणी, मावस बहीण यांच्यातील विवाह होत.

**द्वितीय चरण विवाह (second degree marriage)** - मावस किंवा चुलत भाऊ बहिणीमधील विवाह व

**तृतीय चरण विवाह - (third degree marriage)** मामाची मुलगी व आत्याच्या मुलामधील विवाह होत. याशिवाय थेट रक्ताचे नाते असलेल्यांमध्ये संबंध झाल्यास तोही कॉनसॅनग्यूनस मॅरेजमध्ये येतो.



**डॉ. सुनिल भगत**
**मो. 94230 64391**

**'पारशी समाज'** पारशी समाज हा छोट्या लोकसंख्येच्या समाजात मोडतो. ह्या समाजातील वारंवार लग्न होत राहिल्यास अनुवांशिक समस्या येऊ शकतात. हा पारशी समाज अल्पसंख्य अन् धार्मिकदृष्ट्या कट्टर असल्याने समाजाबाहेर लग्न न करण्याबाबत आग्रही आहे. समाजाच्या बाहेरील व्यक्ती सोबत विवाह करणाऱ्यांच्या मुलांना पारशी संस्थांकडून कोणत्याही सुविधा पुरविल्या जात नाही. परिणामी या समाजात विवाह जवळच्या नात्यातच होतात. त्यामुळे गुणसूत्रांद्वारे किंवा रक्ताद्वारे संक्रमित होणाऱ्या अनेक आजारांचे प्रमाण पारशी समाजात जास्त आहे. अपस्मार, सेरिब्रल पाल्सी, फेब्राईल सिझर (लहान मुलांमध्ये), हालचालीतील असमर्थता अशा मज्जासंस्थेशी संबंधित विकारांपैकी एखादा तरी विकार प्रत्येक पारशी माणसात आढळतो.

पार्किन्सन्सचे रुग्णही पारशी समाजात मोठ्या प्रमाणात आहेत. साठीच्या पुढे होणारा हा विकार पारशी समाजात 40 पेक्षाही कमी वयोगटातही दिसून येतो. मधुमेह, रक्ताचा व अन्य कर्करोग यांची शक्यताही पारशी माणसात मोठ्या प्रमाणात असते. तसेच उशीराने मुले झाल्यास हार्मोन्समधील बिघाडांमुळे मुलांना विकलांगतेचा धोकाही संभवतो. यामुळेच पारशी समाजाची लोकसंख्या दिवसेंदिवस घटत जाऊन ते नामशेष होण्याच्या मार्गावर दिसत आहे. असे म्हटले जाते की 2011 च्या सुमारास ती 50,000 होती आणि 1950 पर्यंत नामशेष होण्याच्या मार्गांवर आहे.

**'जवळच्या नात्यांमधील विवाह'**

अनुवांशिक आजारांविषयी अज्ञान आणि आर्थिक परिस्थितीमुळे आरोग्याकडे होत असलेल्या दुर्लक्षाने नव्या पिढीत अपंगत्वाचा टक्का वाढत आहे. कारण जवळच्या नात्यातील वर-वधूमध्ये जवळपास 25 ते 50 टक्के जेनेटिक मटेरियल सारखेच असल्यामुळे अनुवांशिक आजार प्रखरतेने त्यांच्या अपत्यांना ग्रासतात; उदाहरणार्थ शारीरिक विसंगती (उदा., चेहऱ्यावरील वैशिष्ट्ये, कंकाल विकृती), विकासात्मक विलंब, न्यूरोलॉजिकल समस्या (उदा. फेफरे, संज्ञानात्मक कमजोरी), दीर्घकालीन आरोग्य समस्या (उदा. अशक्तपणा, श्वसन समस्या) असतात.

**फेनिलकेटोन्युरिया (PK)** - या आजारात शरीरात फेनिलॅलानिन नावाचा एक पदार्थ जास्त होतो, जो मेंदूसाठी हानिकारक असतो. **सिस्टिक फायब्रोसिस** - हे फुफ्फुसांवर आणि पचन संस्थेवर परिणाम करणारा आजार आहे, जो अनुवांशिक असतो. **सिकल सेल रोग** - या आजारात रक्तातील लाल पेशींची (red blood cell) रचना बदलून जाते, ज्यामुळे त्यांना अनेक समस्या येतात. **वर्णांधता (color blindness)** - या आजारात काही लोकांना रंगांमध्ये फरक दिसू शकत नाही, जो अनुवांशिक असू शकतो. **पचन समस्या** - सिस्टिक फायब्रोसिसमध्ये पचन संस्थेवर परिणाम होतो. **थॅलेसेमिया** - हा एक आनुवंशिक रक्त विकार आहे. या विकारात शरीर हिमोग्लोबिन योग्य प्रमाणात तयार करू शकत नाही, ज्यामुळे अशक्तपणा (ॲनिमिया) होऊ शकतो. असेच अनेक आनुवंशिक आजार बळावतात. परंतु जनुकीय संबंध नसलेल्या कुटुंबातील अपत्यांमध्ये असे होण्याची शक्यता नगण्य असते. अनुवंशिकतेच्या सिद्धांतानुसार प्रत्येक गुणधर्मासाठी उदा. घारे डोळे, यासाठी गुणसूत्रांचा संच असतो. त्यात सर्वस्व गाजवणारे (Dominant) व दबावाला बळी पडणारे (recessive) असे दोन प्रकार असतात. दोन वर्चस्व गाजवणाऱ्या गुणसूत्रांची गाठ पडली, तर तिसराच गुण तयार होतो. एक वर्चस्व गाजवणारे व दुसरे दबावाला बळी पडणारे गुणसूत्र आले, तर वर्चस्व गाजवणाऱ्या गुणसूत्रांची सरशी होते व त्याप्रमाणे बालकात गुणसूत्रे दिसून येतात.

वेगवेगळ्या समाजातील लोक एकत्र आल्यास त्यांच्यात असणारी गुणसूत्रे विविध प्रकारची असतात. साहजिकच त्यांच्यातील वर्चस्व गाजवणाऱ्या गुणसूत्रांचा संकर होऊन निरोगी समाज जन्माला येतो. 'जवळच्या नात्यात विवाहात घेण्याची काळजी' आनुवंशिक आजार हे माता-पितांकडून मुलांमध्ये येणारे रोग आहेत. या आजारांवर उपचार शक्य आहेत आणि आनुवंशिक सल्ला (genetic counselling) या आजारांचा धोका कमी करण्यासाठी उपयुक्त असतो. ज्यांचे लग्न जवळच्या नात्यात झाले आहे त्यांनी घाबरून न जाता आनुवंशिक आजारांसाठी डॉक्टरच्या मदतीने पुढील काळजी घ्यावी.

गरोदर राहण्याचा निर्णय घेतांना त्याआधी तीन महिने फोलिक ॲसिड, सप्लिमेंट्स घ्याव्यात. जेनिटिक कौन्सिलर किंवा आपल्या स्त्रीरोग तज्ज्ञांना जवळच्या नात्यात लग्न झाल्याचे सांगून सल्ला घ्यावा. 14 ते 16 आठवड्यांनी ट्रिपल टेस्ट करून घ्यावी. 29 ते 22 आठवड्यांनी फोर डायमेन्शनल सोनोग्राफी (ॲनामोली स्कॅन) करून घ्यावी. भारतात आनुवंशिक आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे.

या आजारांना टाळण्यासाठी कोणतेही रामबाण उपाय सध्या उपलब्ध नसल्यामुळे ते टाळणे हाच एकमेव पर्याय आहे. कोणी कोणाशी लग्न करावे हा ज्याचा त्याचा व्यक्तिगत व भावनिक मुद्दा असला तरी पुढील पिढ्यांचे नुकसान टाळलेले बरे! ■ ■

# पर्यावरणाशी जोडू नाते

*पर्यावरण म्हणजे फक्त झाडे-झुडपे नाहीत, पर्यावरण म्हणजे आपल्या आयुष्याचा मूलभूत घटक आहे. जसे आई मुलाला श्वास देते, तशी ही निसर्गरूपी मातृ आपल्याला हवा, पाणी, अन्न, ऊब आणि सौंदर्य देते... व आपण त्याच्याशी नाते घट्ट करतो.*

आज विज्ञान, तंत्रज्ञान, विकासाच्या नावाखाली आपण पर्यावरणाला झाकून टाकतोय. पण निसर्गाला विसरून केलेला कोणताही विकास हा अर्धवटच **'वाढती झाडे हेच आपले वैभव, हिरवे रान हिच खरी संपत्ती व धन.'**

पर्यावरणाशी नाते जोडणे म्हणजे फक्त 5 जूनला वृक्षारोपण करून फोटो काढणे नव्हे... तर दररोज निसर्गासाठी थोडे थांबणे, विचार करणे, कृती करणे!

**छाया जगदिश शहाणे**
**मो.7020588484**

हे नाते जपायचे. पण ते कसे? एक झाड लावू आणि त्याला पाणीही घालू. ओला कचरा व सुका कचरा फेकून न देता योग्य पद्धतीने विल्हेवाट लावू. प्लास्टिकच्या पिशव्याऐवजी, कापडाच्या पिशव्या वापरू. गरजेपुरताच वापर, हव्यास टाळून, साधेपणाने जगू पक्ष्यांसाठी एखादी कळशी पाणी व मातीच्या कुंडीत एखादी फुलवेल लावू. मोबाईलची स्क्रीन सोडून एकदा तरी आभाळाकडे बघू!




पर्यावरण हे 'बाहेरच' नाही - ते 'आपलेच' आहे.

घरात झाड लावणे म्हणजे अंगणात आनंद रुजवणे. तलाव वाचवणे म्हणजे गावाला जीवन देणे. पक्षी वाचवणे म्हणजे आकाशात संगीतातले स्वातंत्र्य जपणे! आपल्या पिढीकडे बघताना लाज वाटू नये, आपण असा काळ जपला, की जिथे पाण्याला चव होती, आकाशाला रंग होता आणि माणसाचे निसर्गाशी नाते होते. पण हळूहळू हा समतोल बिघडला आहे. पर्यावरणाचा असमतोल यामुळे ग्लोबल वार्मिंगसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. पर्यावरण संतुलन ही आज काळाची गरज आहे.

निसर्गाचे चक्र अगदी अद्भुत आहे. झाडे प्राणवायू देतात, नद्या जीवन देतात, माती अन्न उगम करते, आणि आकाश आपल्या अस्तित्वाची साक्ष देते. हे सगळे एकमेकांशी जोडलेले आहे. यालाच आपण म्हणतो पर्यावरण संतुलन. म्हणजेच निसर्गात सर्व घटक एकमेकांच्या साहाय्याने समरसतेने चालतात. पण आज हे संतुलन बिघडतेय. माणसाच्या अतीलोभामुळे जंगले कमी झाली, नद्या प्रदूषित झाल्या, हवामानात उलथापालथ झाली. एकीकडे अतिवृष्टी, दुसरीकडे दुष्काळ. कुठे वणवे तर कुठे हिमनग वितळणे. ही सगळीच उदाहरणे पर्यावरण असंतुलनाची.

**पर्यावरण संतुलन का गरजेचे आहे ?** - झाडे आणि प्राणी एकमेकांवर अवलंबून असतात. जर प्रजाती नष्ट झाल्या, तर अन्नसाखळी तुटते. स्वच्छ पाणी, शुद्ध हवा, सुपीक माती, या सर्वांचा परिणाम थेट आपल्या आरोग्यावर होतो. हवामान स्थिर राहण्यासाठी जंगले, समुद्र आणि वायुमंडल यांचे संतुलन हवेच. पर्यावरणाचे संतुलन राखणं म्हणजे आपल्या भावी पिढ्यांना जगण्याचा हक्क देणे. आज आपण थोडे थांबलो, विचार केला आणि कृती केली. तर उद्या पृथ्वी हिरवी राहील, नद्या वाहतील आणि आकाश निळे दिसेल. शेवटी एवढेच, **'निसर्गाचे ऋण फेडता येत नाही, पण त्याच्याशी नाते जपता येते आणि तेच नाते आपल्याला हिरवे भविष्य देते!'** त्यामुळे माणसाला आपल्या भविष्यासाठी पर्यावरणाला अनुकूल वागावे लागेल तरच पर्यावरण माणसाला जपेल व भरभरून देईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! ■ ■

# कोरोना काळात पोरक्या झालेल्या दोन बहिणींचा हक्कासाठी संघर्ष




**नागपूर :** कोरोनाच्या भयाण काळात आधी वडील आणि दहा दिवसांच्या अंतराने आई गेली. सांभाळ करण्याच्या नावावर रक्ताचे नाते असलेल्या आत्या आणि काकांनी दोघी बहिणींचा प्रचंड छळ केला. संपत्ती हडप करण्यासाठी वाट्टेल ते प्रयत्न केले. याही स्थितीत दोघीही लढत राहिल्या. आज हक्काचे घर हाती आले असले तरी त्यांचा छळ अजूनही संपलेला नाही.

नियती आणि वंशिका या दोन बहिणींची स्वतःच्या सन्मानाची आणि आईवडिलांची हक्काची संपत्ती मिळविण्यासाठीची लढाई आजही सुरूच आहे. चार वर्षापासून सुरू असलेल्या संघर्षाला धीरोदात्तपणे तोंड देऊनही बोलण्यात मृदुता कायम असलेली नियती सांगते, वडील पोलिस आयुक्तालयात हवालदार, तर आई सहकार विभागात कार्यरत होती. 19 मे 2021रोजी बाबा आणि त्यानंतर 12 दिवसांनी आई कोरोनामुळे गेली. त्यांना शेवटचे बघताही आले नाही. सुरुवातीला मावशी आम्हाला घरी घेऊन गेली. पण काहीच दिवसांत आत्या आम्हाला तिच्या घरी घेऊन आली. यावेळी नियती 15, तर वंशिका 9 ते 10 वर्षांची. आत्या वाट्टेल ती कामे करायला लावायची. त्यांना स्वतःच्या घरी राहायला जायचे होते. पण कधी आत्याकडे, कधी काकाकडे, तर कधी मावशीकडे त्यांना राहावे लागले. या काळात आत्या आणि काकाने घरावर कब्जा केला आणि काही नातेवाईक अजूनही करतात बदनामी. नियती सांगते, आमची संपत्ती हडप करण्याचा काही नातेवाईकांचा डाव होता. पण तो साध्य न झाल्यामुळे त्यांनीच खूप खालच्या पातळीवर बदनामी केली. हा प्रकार आजही थांबलेला नाही. पण आता आम्ही दोघीही खचणार नाही, असा विश्वास त्या व्यक्त करतात. पैसा, स्थावर संपत्ती, आईचे सोने आणि इतरही मालमत्ता हडप केली. नातेवाईकांनीच केला संपत्तीसाठी छळ आईच्या मायेसाठीही संघर्ष आई-वडील गेले तेव्हा नियती आणि वंशिका अल्पवयीन होत्या. याचा फायदा घेत आत्याने त्यांचे कागदोपत्री पालकत्व सिद्ध केले. आता नियती 18 वर्षांची झाल्यामुळे ती या नियमातून मुक्त झाली. पण वंशिकाचे पालकत्व अजूनही आत्याकडे आहे. नियमानुसार आता नियती वंशिकाचे पालकत्व घेऊ शकते. लहान बहिणीला ती आईसारखीच जपत आली आहे. पण आईच्या मायेसाठीचा कागदोपत्री संघर्ष सुरूच आहे. सगळी कागदपत्रे गायब केली. आजही देण्यास तयार नाही. या काळात मावशीने खूप मदत केली. दोघींच्या हक्काचे त्यांना मिळावे यासाठी संबंधित विभागांना मावशीने पत्रे दिली. त्यामुळे वडिलांची पेन्शन सुरू होण्यास मदत झाली. पोलिसांसह संबंधित विभागांना आत्याचा हेतूही लक्षात आला. खूप संघर्ष करून वडिलांचे हक्काचे घर मिळाले. पण कागदपत्रे आणि इतरही गोष्टींसाठी कधी न्यायालयात, कधी पोलिस ठाण्यात चकरा सुरूच असल्याचे नियती सांगते.

## जिगाव सिंचन प्रकल्पाच्या कार्यात अडथळे

**जिगाव' प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे 38 टक्के भूसंपादन रखडलेलेच**



**अकोला :** खारपाणपट्ट्यातील शापित भागात मोठी सिंचन व्यवस्था निर्माण होण्यासाठी महत्त्वाकांक्षी जिगाव सिंचन प्रकल्पाला तीस वर्षांपूर्वी मंजुरी मिळाली. अपुऱ्या निधीसह विविध कारणांमुळे जिगाव सिंचन प्रकल्पाच्या कार्यात अडथळे आले. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी अद्यापही 38 टक्के भूसंपादन बाकी आहे. त्यासाठी आणखी चार हजार 631 हेक्टर जमीन लागेल. त्यामध्ये सर्वाधिक खासगी जमिनीचा समावेश आहे.

जिगाव प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यात पूर्णा नदीवर निर्माणाधिन आहे. प्रकल्पाच्या माती धरणाची एकूण लांबी 8.61 कि.मी. असून महत्तम उंची 35.25 मी. आहे. प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता 736.58 द.ल.घ.मी. असून एकूण 15 उपसा सिंचन योजना अंतर्भूत आहेत. जिगाव प्रकल्पाचे संपूर्ण लाभक्षेत्रात वितरण व्यवस्था बंदनलिका वितरण प्रणालीद्वारे प्रस्तावित आहे. त्याद्वारे बुलढाणा व अकोला जिल्ह्यातील एकूण एक लाख 16 हजार 770 हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात नियोजित आहे.




## उत्कर्ष बुद्ध विहार मोठा इंदोरा नागपूर.

भोसलेकालीन काळात येथे महार लोकांचे देवस्थान होते. 14 ऑक्टोबर 1956 ला महार लोकांनी बौद्ध धम्माचा स्विकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार काल्पनिक देवी-देवता यांचा त्याग करून मंदिराला नाकारून तत्कालीन काळातील लोकांनी बुद्ध विहार निर्माण केले. दररोज सामूहिक वंदना, 22 प्रतिज्ञा वाचन, सर्व कार्यक्रम होता. अभ्यासिका सह वाचनालय आहे.

संवाद मित्र, मिलिंद मेश्राम
मो. 8446832776

## महत्वाचे

### बुद्ध विहार पंचकमेटी व विशाखा महिला मंडळ यांचे तर्फे रविवारी विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागपूर :** बुद्धविहार पंचकमेटी व विशाखा महिला यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. 08 जून 2025 ला दुपारी 3.00 वाजता परिसरातील 10 वी व 12 वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार बोधीवृक्ष बुद्ध विहार, बोधीवृक्षनगर, बजरंगनगर, रोड नं. 6, नागपूर येथे आयोजित केला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष ईश्वर कडबे, अध्यक्ष, बुद्ध विहार पंच कमेटी, मुख्य मार्गदर्शक इंजि. संजय श्रृंगारे, कार्यकारी अभियंता, एम.एस.ई.बी. डॉ. शाम मेश्राम, एम.बी.बी.एस., एम.डी. इंजि. प्रबोध मेश्राम, व्ही.एन.आय.टी.आशिष फुलझेले, मानवाधिकार संरक्षण मंच यांच्या उपस्थितीत होणार आहे. परीसरातील 10 वी आणि 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मो. 9422802252, 7264937288, 7620150041, 9373573209 संपर्क साधावा.

### एकुलत्या बहिणीच्या लग्नासाठी भावाला न्यायालयाने दिला जामीन



**नागपूर :** एकुलती एक सख्खी बहिण, तिचा विवाह, आणि कारागृहात बंदिस्त असलेला भाऊ ही केवळ एखाद्या चित्रपटातील कथा वाटावी अशी भावना निर्माण करणारी खरी घटना नुकतीच घडली. सख्ख्या बहिणीचे लग्न आणि एकुलता एक भाऊ. साधारणतः भावासाठी आणि बहिणीसाठी फार भावनिक क्षण असतो. मात्र भाऊ हत्येच्या आरोपाखाली कारागृहात बंदिस्त असल्याने तो या भावनिक क्षणापासून मुकण्याची शक्यता होती. अशा स्थितीत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बंदिस्त भावाला दोन दिवसासाठी तात्पुरती जामीन देत विवाहसोहळ्यात सहभागी होण्याची परवानगी दिली. ही वेळ गमावू नये यासाठी टिकेशने न्यायालयात 3 जून ते 6 जूनदरम्यान तात्पुरता जामीन मिळावा यासाठी अर्ज दाखल केला

### बोगस बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक



**भंडारा :** पवनी तालुक्यातील मांगली (चौ.) येथील शेतकऱ्यांची आसगाव येथील बियाणे कंपनीने फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कंपनीने 100 दिवसात निघणारा धानाचा बियाण दिले, मात्र 150 दिवस होऊन देखील धान निघाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. पवनी तालुक्यातील मांगली चौरास येथील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामा करता आसगाव येथील गुरुदेव कृषी केंद्रातून केदार सीड्स कंपनीच्या के एस गोल्ड नावाचे बियाणे शेतकऱ्यांनी कृषी केंद्रातून खरेदी केले. हे धान शंभर दिवसांमध्ये निघणार असल्याचा दावा कृषी केंद्र चालकांनी केला.

### हत्यासत्राने अकोला जिल्हा हादरला




**अकोला :** हत्येच्या सत्राने अकोला जिल्हा हादरून गेला आहे. गेल्या सात दिवसात तीन वेगवेगळे हत्याकांड घडले. अकोट तालुक्यातील वस्तापूर गावात रात्री उशिरा एका 22 वर्षीय तरुणावर चाकू हल्ला करून हत्या करण्यात आली. मंगेश बिहारीलाल ढीगर असे मृतक, तर सेवकराम पतिराम साकोम असे आरोपीचे नाव आहे. अकोट तालुक्यातील वस्तापूर गावात काल आठवडी बाजार भरला होता. या बाजारात खरेदीसाठी आलेला मृतक मंगेश आणि आरोपी सेवकराम यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद विकोपाला गेला. सेवकरामने वादाचा राग मनात ठेवून रात्रीच्या वेळी मंगेशला एकट्याला गाठले. वादाच्या रागातून मंगेशच्या पोटात आणि छातीवर चाकूने गंभीर वार केले. मंगेश रक्ताच्या थारोळ्यात पडला. घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला

### अपंगांना रेल्वे तिकिट क्यूआर कोडद्वारे मिळणार



**नागपूर :** अपंगांना रेल्वेने प्रवास सवलत घेण्यासाठी रांगेत लागून किंवा रेल्वे कार्यालयात जाऊन प्रक्रिया करण्याची गरज आता पडणार नाही. रेल्वे त्यांना डिजिटल ओळखपत्र देणार आहे. प्रवासी अपंगांना शारीरिक प्रमाणपत्र नेहमी द्यावे लागत होते. डिजिटल ओळखपत्रामुळे त्यांचा हा जास थांबेल. रेल्वेने सवलतीसाठी वापरल्या जाणाऱ्या ओळखपत्र प्रणालीचे संपूर्ण डिजिटायझेशन केले आहे. या डिजिटल ओळखपत्रात क्यूआर कोड असेल. तो इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) च्या ऑनलाइन बुकिंग प्रणालीत तसेच काउंटरवर तिकीट आरक्षणासाठी स्कैन करता येईल. यामुळे अपंग प्रवाशांना वारंवार कागदपत्रे सादर करावी लागणार नाही.

## भारतीय बौद्ध महासभा नगर शाखेच्या वतीने दहा दिवसीय बाल संस्कार शिबिराचा समारोप



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट हरदास नगर कांडप मशीन जवळ, लष्करीबाग, उत्तर नागपूर येथे भारतीय बौद्ध महासभेचे मुख्य कार्यालयात दहा दिवसीय बाल संस्कार शिबिराचे समापण समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी पंचशीला सहारे भारतीय बौद्ध महासभेचे नगर शाखा या होत्या. प्रमुख मार्गदर्शक जे. आर. गोडबोले अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा महानगर जिल्हा शाखा यांनी शिबिरात बसलेल्या मुला मुलींना दहा दिवसीय शिबीरामध्ये दररोज प्रत्येक केंद्रीय शिक्षिकांनी दहा दिवस कसे शिकविले या बाबतीत जिल्हा अध्यक्ष गोडबोले यांनी प्रत्यक्ष तोंडी परीक्षा घेतली व सर्वच विद्यार्थी परिक्षेत पास झाले, भारतीय बौद्ध महासभेचे वतीने पास झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात येईल, असे ठरले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहर अध्यक्ष व जिल्हा कोषाध्यक्ष त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट हरदास नगर लष्करीबाग उत्तर नागपूर ट्रस्टी सचिव भगवान कांबळे, प्रामुख्याने उपस्थित होते. दहा दिवसीय शिबीरामध्ये बसलेल्या विद्यार्थीना शुभेच्छा दिल्या, शिबिरात प्रमुख उपस्थिती माया मेश्राम, संध्या पाटील, साधना सोमकुवर, रमा सोमकुवर, गीता जांभूळकर, इत्यादी अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. संचालन वनमाला कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गीता जांभूळकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. सरणतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## नागपूरच्या विद्यार्थ्याचे अनोखे संशोधन

**नागपूर :** आजच्या आधुनिक धावत्या जीवनशैलीत वाहन बाळगणे एक मूलभूत गरज बनली आहे आहे. मात्र वाढत्या इंधन दरांसोबत वाहनांची नियमित देखभाल करणे अतिशय महागडे झाले आहे. वाढत्या महागाईच्या काळात वाहतूक खर्च सर्वसामान्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. वाहनाची तसेच इंजिनची देखभाल करणे यासाठी महागड्या इंजिन ऑईलचा वापर करावा लागतो. अशा परिस्थितीत रामदेवबाबा विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाचा विद्यार्थी अपूर्व संजय डे याने एक अनोखा प्रयोग यशस्वी केला आहे. विद्यार्थ्याने 'इम्पीरियल ल्युब्रिकेंट' नावाने एक नवीन सिंथेटिक इंजिन ऑईल तयार केले असून, यामुळे इंजिन अधिक काळ टिकते, इंधनाचा वापर कमी होतो आणि देखभाल खर्चात मोठी बचत होते, असा त्याचा दावा आहे. जुनी स्कुटी वारंवार बंद पडत असल्याने अपूर्वने या समस्येवर उपाय शोधण्याचा निर्धार केला. त्यातून त्याने हे सिंथेटिक ऑईल विकसित केले. त्यामध्ये खास ल्युब्रिकेंट्सचा वापर करण्यात आला असून, पारंपरिक इंजिन ऑईलपेक्षा हे दोन ते तीन पट जास्त परिणामकारक ठरते, असा दावा त्याने केला आहे.

> “ या ऑईलमुळे इंजिनचे तापमान 15 ते 22 टक्क्यांनी कमी होते. परिणामी, इंजिनची कामगिरी सुधारते आणि त्याचे आयुष्यमानही वाढते. याशिवाय, 10 ते 15 टक्के इंधन बचतही होते. वाहनाच्या देखभालीचा खर्च यामुळे लक्षणीयरित्या कमी होतो. सध्या अपूर्वने या ऑईलच्या व्यावसायिक निर्मितीसाठी काही कंपन्यांशी बोलणी सुरू केली आहे. भविष्यात सामान्य लोकांसाठी स्वस्त आणि प्रभावी पर्याय उपलब्ध करून देणे, हेच त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्याच्या या संशोधनाबद्दल विद्यापीठ पातळीवर त्याला पुरस्कार मिळाले असून, भविष्यात समाजोपयोगी संशोधनावर लक्ष केंद्रित करण्याचा त्याचा मानस आहे.
> - अपूर्व



## `महावितरण'च्या विद्युत सुरक्षा सप्ताहाचा जागर



**नागपूर :** महावितरणच्या 20 व्या वर्धापनदिनानिमित्त सध्या सुरू असलेल्या 'विद्युत सुरक्षा सप्ताहा' ने नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात जोरदार जनजागृतीची लाट आणली आहे. विजेच्या सुरक्षित वापराबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश असून, यासाठी विशेषतः शालेय विद्यार्थ्यांसह कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित करण्यात आलेल्या निबंध आणि चित्रकला स्पर्धांना प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. महावितरणच्या नागपूर परिमंडळाने हा विद्युत सुरक्षा सप्ताह अत्यंत कल्पकतेने आयोजित केला आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना विद्युत सुरक्षेचे महत्त्व समजावून देण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केला जात आहे, ज्यात 'निबंध आणि चित्रकला' स्पर्धा आकर्षण ठरल्या आहेत. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विजेच्या सुरक्षित वापराच्या विविध पैलूंवर आपल्या शब्दांतून प्रभावीपणे प्रकाश टाकला. विजेचा वापर करताना घ्यावयाची खबरदारी, शॉर्ट सर्किट टाळण्याचे उपाय, विजेच्या धक्क्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, तसेच घराबाहेर व शेतात विजेच्या तारांपासून सुरक्षित कसे राहावे, यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी माहितीपूर्ण आणि विचारप्रवर्तक निबंध सादर केले. या निबंधांमधून त्यांची विद्युत सुरक्षेबाबतची सखोल माहिती आणि चिंतनशीलता स्पष्टपणे दिसून आली, ज्यामुळे विजेच्या बाबतीत होणारी छोटीशी निष्काळजी किती जीवघेणी ठरू शकते, याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. चित्रकला स्पर्धेनेही विद्युत सुरक्षेचा संदेश कलात्मकपणे घराघरात पोहोचवला. चिमुकल्या कलाकारांनी आपल्या कल्पनाशक्तीला रंग आणि कुंचल्यांची जोड देत विजेच्या तारांना स्पर्श न करणे, तुटलेल्या तारांपासून दूर राहणे, ओल्या हातांनी स्विचला स्पर्श न करणे, आणि विद्युत उपकरणांची नियमित तपासणी करणे यांसारख्या सुरक्षा नियमांना चित्रांद्वारे प्रभावीपणे मांडले.

## कापूस बियाण्याच्या टंचाईने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ




**अकोला :** यंदाच्या खरीप हंगामात देखील कापसाच्या बियाण्याच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागणार आहे. बियाण्याचे उत्पादन कमी झाल्याने पुरवठ्यावर परिणाम झाला. त्यामुळे बियाण्यांसाठी शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागण्याची चिन्हे आहेत. शेतकऱ्यांनी कापूस पिकाच्या एकाच कंपनीच्या विशिष्ट वाणाचा आग्रह न धरता इतर कंपन्यांच्या वाणांची निवड करून लागवड करण्याचा सल्ला जिल्हा कृषी विकास अधिकाऱ्यांनी दिला. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी लगबग सुरू झाली आहे. कापूस, सोयाबीन, तूर पिकांच्या बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची कृषी सेवा केंद्रांवर गर्दी होतांना दिसत आहे. शेतकऱ्यांच्या आवश्यकतेनुसार बियाणे उपलब्ध करून दिले जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात येत असले तरी शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या बियाण्यांची बाजारपेठेत मोठी टंचाई आहे. शेतकऱ्यांकडून अजित 155 व अजित 5 या वाणांना मोठी मागणी असते. बाजारपेठेत त्याची कमतरता आहे. अजित सीडस या कंपनीने सर्व वाणांच्या सुमारे एक लाख 29 हजार 200 पाकिटांचा पुरवठा जिल्ह्यात केला. अजित 155 व अजित 5 या बियाण्याचे उत्पादन कमी झाल्याने पुरवठ्यावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी वेळोवेळी कंपनीला अकोला जिल्ह्यात वाणांचा पुरवठा करण्याचे सूचित केले. पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनीही बैठकीत तसे निर्देश दिले होते व शासन स्तरावरही पाठपुरावा केला. मात्र, तरी देखील मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी आहे. त्यामुळे ते बियाणे प्राप्त करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या समस्येचा सामना करावा लागत आहे. विशिष्ट बियाण्यांची कमतरता लक्षात घेऊन त्याचा काळाबाजार होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी बाजारात उपलब्ध असलेल्या इतर वाणांची निवड करून लागवड करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामामध्ये चार लाख 32 हजार 10 हेक्टरवर पेरणीचे नियोजन आहे. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद पिकाची पेरणी केली जाईल. त्यामध्ये सर्वाधिक सोयाबीनचे क्षेत्र दोन लाख 41 हजार 645, तर कापसाचे एक लाख 27 हजार 300 हेक्टरवर पेरणी होण्याचा अंदाज आहे. खरीप हंगामासाठी बियाण्यांचे सोयाबीन 63 हजार 431 क्विंटल, कापूस (बीटी) तीन हजार 183 क्विंटल म्हणजेच सहा हजार 365 पाकिटांचे नियोजन करण्यात आले आहे.




## बामणी येथे जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल जागृती रॅली

**चंद्रपूर :** सायकल स्नेही मंडळ बामणी बल्लारपूरचे वतीने जागतिक सायकल दिनानिमित्त काढलेल्या सायकल रॅलीस बामणी येथे उत्तम प्रतिसाद मिळाला. सायकल चालवा, निरोगी रहा, प्रदुषण टाळा आणि पर्यावरण वाचवा असे आवाहन करत सकाळी नियोजनानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रापासून रॅलीला सुरूवात झाली. रॅली टी पॉईट, ग्रामपंचायत, गुरूनानक कॉलेज, गोरक्षण वार्ड, टीचर कॉलनी मार्गाने जाऊन परत वापस आली. दरम्यान या रॅलीच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. सुरेंद्र उमरे होते तर प्रा. प्रवीण मत्ते, सागर जोशी, डॉ. श्रावण बानासुरे, मनोहर वाडेकर, कार्तिक वराटे, प्रा. उमेश कडू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्य संयोजक विनायकराव साळवे यांनी केले तर संचालन सचिन बरडे यांनी केले. आभार प्रदर्शन भास्कर फरकाडे यांनी केले. रॅली यशस्वी करण्यासाठी बंडू मोरे, विलास घुंगरुटकर, ज्ञानेश्वर काटोले, सूर्यभान मालेकर, गणेश उरकुडे, बालाजी टोंगे, ज्ञानेश्वर हिरादेवे, अंशुल साळवे, दिवाकर निखाडे, शशांक रामटेके, राकेश लोणारे, घनश्याम जुवारे, गजानन सोनटक्के, अविनाश मुमुडवार, तुळशीराम पिंपळकर आदी सायकल स्नेहींनी अथक परिश्रम घेतले. बामणी येथे सायकल रॅलीचे उत्तम आयोजन केल्याबद्दल ज्येष्ठ सायकल स्नेही ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांनी सर्व सदस्यांना धन्यवाद दिले आहे.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क ९३२५६२९६३५

# चंद्रपुरातील धान गिरण्यांवर छापे...



**चंद्रपूर :** लगतच्या गडचिरोली जिल्ह्याप्रमाणेच चंद्रपूर जिल्ह्यातही धार गिरण्यांच्या माध्यमातून कोट्यावधीचा तांदूळ घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांच्या नेतृत्वातील पाच सदस्यीय समितीने नागभीड येथील चांदतारा इंडियन स्टीम राईस इंडस्ट्रीज व गुप्ता राईस एक्सपोर्ट या दोन धान गिरण्यांवर छापे टाकले. यात उचल केलेले धान व प्रत्यक्षात भरडाई केलेल्या तांदळाच्या साठ्यात मोठी तफावत आढळून आली. त्यामुळे समितीने तांदूळ घेण्यास बंदी घातली.

राज्य सरकार पणन अधिकाऱ्यांमार्फत हमीभावानुसार शेतकऱ्यांकडील धान खरेदी करीत असते. या आधारभूत धान खरेदीसाठी जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांमार्फत योजना राबवली जाते. जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी जिल्ह्यात ठिकठिकाणी आधारभूत धान खरेदी केंद्रे ठरवून दिली आहेत. याद्वारे बहुतांश आदिवासी विकास महासंघ आणि जिल्हा मार्केटिंग अधिकारी धान खरेदी करीत असतात. यासाठी तालुकास्तरावर विविध कार्यकारी शेतकरी सहकारी सोसायट्यांनाही आधारभूत धान खरेदी केंद्रे दिलेली आहेत. या माध्यमातून धान खरेदी केले जाते. धान भरडाईसाठी जिल्हा पणन अधिकारी धान गिरण्यांना 'डिलीव्हरी ऑर्डर' देत असतात. त्यावरून धान गिरणी धारक धानाची उचल करतात. उचल केलेल्या धानाच्या 67 टक्के तांदूळ शासनाला द्यायचे असतो. हा तांदूळ सरकारी स्वस्त धान्य दुकानांमार्फत नागरिकांना वितरित केला जातो.

दरम्यान, धान गिरणी धारकांनी उचल केलेले धान व त्यानंतर भरडाई केलेले तांदूळ यात साम्य आहे की नाही, हे तपासण्याचे काम जिल्हा पणन अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचे आहे. प्रत्यक्षात चंद्रपूर जिल्ह्यात धान गिरणी धारकांकडून उचल केल्या गेलेले धान आणि भरडाई केलेल्या तांदळाच्या साठ्यात हजारो क्विंटलची तफावत दिसून आली.

याबाबतची तक्रार राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे करण्यात आली होती.

> “ काही अधिकारी व धान गिरणी धारक यांच्या हातमिळवणीतून हा तांदूळ घोटाळा करण्यात आल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यासंदर्भात जिल्हा पणन अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादूरकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी, उपसचिव राजश्री सारंग यांच्या नेतृत्वातील पाच सदस्यीय समितीने या दोन्ही धान गिरण्यांवर अचानक छापा कारवाई केल्याचे सांगितले. या दोन्ही धान गिरण्या महेंद्र गुप्ता यांच्या असल्याचे सांगितले जात आहे.

त्यानुसार विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांच्या नेतृत्वातील पाच सदस्यीय समिती चंद्रपूर जिल्हा दौऱ्यावर आली. समितीने स्थानिक अधिकाऱ्यांना सोबत घेतले खरे, मात्र त्यांना कुठलीही कल्पना न देता चिमूरला जायचे आहे, असे सांगून थेट नागभीड गाठले. तेथील चांदतारा इंडियन स्टीम राईस इंडस्ट्रिज व गुप्ता राईस एक्सपोर्ट या दोन धान गिरण्यांवर छापे टाकले. तेथील तांदळाचा साठा तपासला असता मोठी तफावत आढळून आली. चौकशी अहवाल पूर्ण होईपर्यंत येथील तांदूळ उचलण्यास मनाई करण्यात आली. तसेच या धान गिरणी धारकांना धानाची भरडाई करण्यासाठी उचल देण्यात येऊ नये, असे आदेशही देण्यात आले.

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648